१०२ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• पुणे, मंगळवार ३ डिसेंबर, २०२४ • वर्ष-४, अंक-७७, पाने-८, किंमत : ₹ ६

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Issue - 77, Vol.- 4 Marathi - Daily - Pune, 3 December, 2024 Page- 8 Price- Rs. 6/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com


## 'महाकुंभ'साठी स्वतंत्र जिल्ह्याची निर्मिती



**लखनौ -** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी महाकुंभ मेळ्यासाठी स्वतंत्र जिल्ह्याची निर्मिती केली आहे. महाकुंभ मेळा असे या नव्या जिल्ह्याचे नाव आहे. काल या जिल्ह्याच्या निर्मितीची घोषणा करण्यात आली. मुख्यमंत्री योगी यांच्या आदेशावरून प्रयागराजचे जिल्हाधिकारी रविंद्र कुमार मांदड यांनी महाकुंभ मेळा जिल्ह्याच्या नावाची घोषणा केली. या नव्या जिल्ह्याच्या निर्मितीमुळे उत्तर प्रदेशातील जिल्ह्यांची संख्या आता ७६ झाली आहे. महाकुंभ मेळ्याचा संपूर्ण परिसर आणि संगमाच्या आसपासच्या ६७ महसुली गावांचा महाकुंभ जिल्ह्यामध्ये समावेश करण्यात आला आहे. प्रयागराजमधील जिल्ह्यांची संख्या आता पाच झाली आहे.

# गुजरातचे माजी मुख्यमंत्री रुपाणी व सीतारामन भाजपाचे निरीक्षक! मुंबईला येणार! शिंदेंचे पुन्हा मौन

■ मुंबई

**महायुती सरकारचा शपथविधी ५ डिसेंबरला आझाद मैदानावर होणार हे निश्चित झाले आहे. मात्र अजून मुख्यमंत्री कोण होणार आणि शिंदे गटाला काय मिळणार ते नक्की नाही. शिंदे यांनी आजही आपल्या सर्व बैठका रद्द करून नाराजीचा सूर कायम ठेवला. दुसरीकडे भाजपाने महाराष्ट्राचे निरीक्षक म्हणून रुपाणी व सीतारामन यांची नावे जाहीर केल्याने भाजपावर आणखी टीका होऊ लागली. कारण रूपाणी हे गुजरातचे माजी मुख्यमंत्री आहेत. त्यामुळे महाराष्ट्राचा मुख्यमंत्री गुजरात ठरविणार असे चित्र निर्माण झाले. फक्त अजित पवार खुशीत आहेत कारण त्यांचे उपमुख्यमंत्रिपद आणि त्यांची खाती निश्चित झाली आहेत.**



**भाजपाचे** विजय रुपाणी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची निरीक्षक म्हणून निवड केली असून ते उद्या मुंबईत येणार आहेत. त्यांच्या उपस्थितीत ४ डिसेंबरला भाजपाच्या आमदारांची बैठक होणार असून त्यात मुख्यमंत्र्याच्या नावाची घोषणा होणार आहे. ५ डिसेंबरला सायंकाळी आझाद मैदानावर शपथविधी होणार आहे . या शपथविधीची जोरदार तयारी मुंबईत सुरू झाली आहे. हा शपथविधी भव्य होईल, असे नियोजन करण्यात येत आहे. त्यासाठी आज मुंबईत आशिष शेलार यांनी बैठक घेतली. मात्र, शपथविधी दोन दिवसांवर आला तरी काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आजही मौन पाळले आहे. दरे गावाहून परतलेले शिंदे आज दिवसभर ठाण्यातील आपल्या घरातच होते. आजारी असल्याचे सांगून त्यांनी आपले सर्व कार्यक्रम, बैठका रद्द केल्या. ते कुणालाच भेटले नाहीत. त्यामुळे शिंदे खरेच आजारी आहेत की, ते मंत्रिपदाच्या वाटपावरून भाजपावर दबाव टाकत आहेत याची चर्चा होती. देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनीही सत्तास्थापनेबाबत कुठलेही वक्तव्य केले नाही.

महायुतीच्या सरकार स्थापनेचा गेले नऊ दिवस चालू असलेला घोळ आजही सुटला नाही. मंत्रिपदाच्या वाटपाबाबत आज शिंदे, फडणवीस आणि अजित पवार यांच्यात बैठक होईल, असे म्हटले जात होते. परंतु आज महायुतीची कुठलीही बैठक झाली नाही. दिल्लीहून आल्यानंतर दरे गावी गेलेले मुख्यमंत्री काल ठाणे येथे परतले. त्यांनी शिवसेनेच्या आमदारांची बैठक बोलावल्याचे सांगितले जात होते. परंतु ही बैठक रद्द करण्यात आली. आजच्या इतर सर्व बैठकादेखील रद्द करण्यात आल्या. डॉक्टरांनी आराम करण्याचा सल्ला दिल्यामुळे आज सर्व बैठका रद्द करण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर एकनाथ शिंदे ठाण्यातील निवासस्थानीच होते. त्यांनी कुणाच्याही भेटीगाठी घेतल्या नाही . ठाण्याला गेलेले विजय शिवतारे , संजय शिरसाट यांनाही शिंदे भेटले नाहीत.

शिंदे यांच्याबद्दल विचारले असता आमदार संजय शिरसाट यांनी सांगितले की, एकनाथ शिंदे दिल्लीच्या राजकारणात जाणार नाहीत, हे निश्चित आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांनी कोणते पद घ्यावे, कोणते पद घेऊ नये. त्याबाबत आम्ही त्यांना कोणताही सल्ला दिलेला नाही. त्या संदर्भातील निर्णय ते स्वतः घेतील. पक्ष प्रमुख म्हणून आणि आमच्या पक्षाचे नेते म्हणून त्यांना तो अधिकार सर्वांनी बहाल केला आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे जो निर्णय घेतील तो निर्णय आम्हाला मान्य असेल. तर शिंदे गटाचे आणखी एक आमदार भरत गोगावले म्हणाले की, मी सत्तेबाहेर राहून काम करतो, असे शिंदे यांनी आम्हाला सांगितले. परंतु तुम्ही सत्तेबाहेर जायचे पान ७ वर

### भव्य शपथविधीचे नियोजन ४०,००० खुर्च्यांची व्यवस्था

५ डिसेंबरला मुंबईच्या आझाद मैदानावर शपथविधी होणार असून त्याच्या नियोजनासाठी आज मुंबईत भाजपाची बैठक पार पडली. या बैठकीनंतर भाजपाचे आमदार मिहीर कोटेचा यांनी माहिती दिली की, शपथविधी सोहळ्याच्या तयारीचा आढावा आम्ही घेतला. हा शपथविधी सोहळा अत्यंत भव्य होणार आहे. या सोहळ्यासाठी ४०,००० खुर्च्या लावण्यात येणार आहेत. परंतु उपस्थितांची संख्या ७०,००० वर जाऊ शकते. या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री पान ७ वर

## शेतकऱ्यांचा पुन्हा एल्गार दिल्ली सीमेवर ठिय्या



**उत्तर प्रदेशातील शेतकरी आपल्या विविध मागण्यांसाठी चलो दिल्ली असा नारा देत आज दुपारी लाखोंच्या संख्येने दिल्लीच्या सीमेवर जमा झाले. पोलिसांनी त्यांना नॉयडा येथील दलीत प्रेरणास्थळ येथेच अडविले. त्यांच्या मागण्यांवर सात दिवसांत चर्चा होईल असे त्यांना आश्वासन देण्यात आले. मात्र त्यानंतरही शेतकरी हटले नाहीत. त्यांनी चर्चा होऊन निर्णय होईपर्यंत पुढील सात दिवस सीमेवर ठिय्या देऊन बसण्याचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांनी यापूर्वी प्रदीर्घ आंदोलने केली आहेत. मात्र सरकारने त्यांच्या मागण्या पूर्ण केलेल्या नसताना हरियाणाच्या जनतेने भाजपाला विधानसभेत दणदणीत यशस्वी केले. त्यामुळे या आंदोलना बद्दल शंका निर्माण होऊ लागली आहे.**

■ नवी दिल्ली

**आज** शेतकऱ्यांना अडविल्यावर शेतकरी व पोलिसांमध्ये संघर्षाची स्थिती निर्माण झाली. पोलिसांनी रस्त्यावर मोठे कंटेनर आणून शेतकऱ्यांचा मार्ग रोखला. तरीही शेतकरी दिल्लीत प्रवेश करण्यावर ठाम होते, अनेक ठिकाणी रस्त्यावरील अडथळे मोडून काढत ते पुढे गेले. पोलिसांनी त्यांना पुन्हा रोखले. तेव्हा कोणत्याही स्थितीत दिल्लीत जाण्याचा निर्धार शेतकऱ्यांनी व्यक्त पान ७ वर

## थोडक्यात...

### भिवंडीचे खा. सुरेश म्हात्रेंनी फडणवीसांची भेट घेतली

**मुंबई -** राज्यात सरकार स्थापन करण्याच्या हालचाली सुरु असतानाच शरद पवार गटाचे भिवंडीचे खासदार सुरेश म्हात्रेंनी भाजपा नेते देवेंद्र फडणवीसांची आज सागर बंगल्यावर भेट घेतली. सुरेश म्हात्रे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या या भेटीचा नेमका तपशील अद्याप समोर आलेला नाही. परंतु म्हात्रे यांनी आपण देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेण्यासाठी आल्याचे सांगितले. मात्र, महायुतीतील घटकपक्षांचे आमदार खासदार देवेंद्र फडणवीस यांच्या गाठीभेटी घेत असताना अचानक महाविकास आघाडीचा खासदार भेटीला आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली.

### राहुल गांधींना कोर्टाचा प्रत्यक्ष हजेरीचा आदेश

**पुणे -** काँग्रेस नेते व लोकसभा विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांना सुनावणीसाठी प्रत्यक्ष हजर राहण्याचे आदेश पुणे सत्र न्यायालयाने पुन्हा एकदा दिले आहेत. राहुल गांधी यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर विरोधी वक्तव्य केल्याचे हे प्रकरण आहे. याप्रकरणी राहुल गांधी यांना आज पुणे सत्र न्यायालयाने प्रत्यक्ष हजर राहण्याचा आदेश होता. मात्र लोकसभा हिवाळी अधिवेशन सुरु असल्यामुळे राहुल गांधी न्यायालयात उपस्थित राहणार नसल्याचे त्यांनी कळवले. या प्रकरणाची पुढील सुनावणी १० जानेवारीला होणार असून, या सुनावणी वेळी त्यांना प्रत्यक्ष हजर राहण्याचे आदेश न्यायलयाने दिले.

### सुप्रीम कोर्टाच्या इमारतीला आग

**नवी दिल्ली -** दिल्लीच्या सर्वोच्च न्यायालयाच्या इमारतीत कोर्ट रुम १२ ला आज दुपारी अचानक आग लागली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाच्या कोर्ट रुम ११ आणि १२ मध्ये सुरु असलेले कामकाज काही काळ स्थगित करण्यात आले. अग्निशमन दलाच्या जवानांनी काही वेळातच आग विझविली. या आगीत कोणतीही हानी झालेली नाही. तसेच आग लागण्याचे कारण अद्याप कळू शकलेले नाही. आग विझवल्यानंतर न्यालायातील सुनावणी कामकाज पूर्ववत सुरु झाले होते.

## संभल परिसरात जाण्यापासून रोखले काँग्रेसच्या शिष्टमंडळाला नजरकैद

■ लखनौ



**संभलला** भेट देण्यासाठी निघालेल्या काँग्रेस प्रदेशाध्यक्ष अजय राय यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाला आज पोलीस आणि जिल्हा प्रशासनाने रोखले. त्यानंतर त्यांना घरात नजरकैदेत ठेवण्यात आले. काँग्रेसने या कारवाईचा निषेध केला.

लखनौ पोलीस व जिल्हा प्रशासनाने अजय राय यांना नोटीस देत हिंसाचारग्रस्त संभलला भेट देण्यास मनाई केली. यामध्ये नोटिशीत असे नमूद केले की, संभल जिल्ह्यातील शांतता आणि जातीय संवेदनशीलता लक्षात घेऊन त्यांनी जनहितासाठी सहकार्य करावे आणि जिल्ह्याने पारित केलेल्या पान ७ वर

## मतदारसंख्या वाढवली! याचिकेवर कोर्टाने आयोगाकडे उत्तर मागितले

■ नवी दिल्ली

**निवडणुकींमध्ये** एका मतदान बुथवरील किमान मतदारांची संख्या वाढवण्याच्या विरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवरील सुनावणी आज सर्वोच्च न्यायालयात पार पडली. न्यायालयाने निवडणूक आयोगाला तीन आठवड्याच्या आत आपले उत्तर सादर करण्यास सांगितले आहे.

निवडणूक आयोगाने एका बुथवरील मतदारांची संख्या ग्रामीण भागात १२०० तर शहरी भागात १५०० अशी वाढवली आहे. या विरोधात इंदू प्रकाश सिंग यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मतदान बुथवर अशा प्रकारे मतदारांची संख्या वाढल्यामुळे मतदारांना मतदानासाठी वेळ लागू शकतो. त्याचा ताण निवडणूक कर्मचाऱ्यांवरही येतो, असे मत याचिकाकर्त्याने मांडले आहे.

## मतपत्रिकेवर निवडणूक घेणाऱ्या मारकडवाडीमध्ये जमावबंदी

■ सोलापूर

**ईव्हीएमचा** घोटाळा उघड करण्यासाठी उद्या मतदानपत्रिकेवर प्रतिरूप मतदान करण्याची घोषणा करणाऱ्या सोलापूर जिल्ह्यातील मारकडवाडी गावात सरकारकडून आता जमावबंदीचे आदेश लागू करण्यात आले आहेत. आजपासून ते ५ डिसेंबरपर्यंत मारकडवाडीमध्ये जमावबंदी लागू करण्यात आली आहे. गावात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने जमावबंदी लागू केली आहे. त्यामुळे मारकरवाडीत उद्या मतदान होणार की नाही, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

माळशिरसच्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी विजया पांगरकर यांनी जमावबंदीचे हे आदेश जाहीर केले आहेत. भारतीय न्याय संहितेचे कलम १६३ नुसार




ही जमावबंदी लागू करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाशिवाय इतर कोणतीही यंत्रणा अशा पद्धतीने मतदान घेऊ शकत नाही, असे पान ७ वर

## मोबाईल कंपन्यांना 'ट्राय'चा दिलासा 'मेसेज ट्रेसेबिलिटी'ला पुन्हा मुदतवाढ

■ नवी दिल्ली

**दूरसंचार** नियामक प्राधिकरणाने (ट्राय) नवी मेसेज ट्रेसेबिलिटी प्रणाली लागू करण्यासाठीची मुदत आज पुन्हा एकदा वाढवून दिली. त्यामुळे मोबाईल सेवा पुरविणाऱ्या कंपन्यांना दिलासा मिळाला आहे.




टेलिमार्केटिंग कंपन्या आणि बल्क मेसेजच्या माध्यमातून आपल्या उत्पादनांची किंवा सेवांची जाहिरात करणाऱ्या कंपन्यांना मेसेज ट्रेसेबिलिटी प्रणालीशी सुसंगत असणे ट्रायने अनिवार्य केले आहे. ग्राहकांना त्यांच्या मोबाईलवर येणाऱ्या मेसेजचा स्त्रोत माहीत करून घेता यावा यासाठी ट्रायने ही नवी प्रणाली लागू करणे अनिवार्य केले आहे.

ऑनलाईन फसवणुकीपासून ग्राहकांचे संरक्षण व्हावे हा या प्रणालीचा उद्देश आहे.

ट्रायने पहिल्यांदा ही प्रणाली १ नोव्हेंबरपासून लागू करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र मोबाईल कंपन्यांनी ही प्रणाली लागू करण्यातील अडचणी दाखवून देताच ही मुदत १ डिसेंबरपर्यंत वाढविण्यात आली.आज पुन्हा मुदतवाढ देत १० डिसेंबरपासून प्रणाली लागू करण्याची सूचना ट्रायने केली आहे.

## मोदी देशात फूट पाडत आहेत मल्लिकार्जुन खरगेंचा घणाघात

■ नवी दिल्ली

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी देशातील जनतेमध्ये फूट पाडत असून त्यांना सर्वसामान्यांच्या हिताशी काहीही देणे घेणे नाही असा घणाघात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी दिल्लीत जंतरमंतर येथे केला. यावेळी त्यांनी संविधान, ईव्हीएममधील घोळ त्याचप्रमाणे निवडणुकीतील गैरप्रकारांवर जोरदार प्रहार केला.

मल्लिकार्जुन खरगे म्हणाले की, मोदी धर्मा-धर्मामध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करत आहे. त्यांच्यात तेढ निर्माण करीत आहेत. देशातील तरुणांना निश्चित दिशा देण्याऐवजी त्यांना मशीदीखालील शिवमंदिरे दिसत आहेत. असेच असेल तर उद्या लाल किल्ला पाडा, ताजमहाल पाडा, कुतुबमिनार पाडा, असा उपरोधिक सल्ला खरगे यांनी केंद्र सरकारला दिला.

## विरोधकांच्या मुद्यांवर चर्चा करण्यास केंद्र सरकार अखेर तयार



■ नवी दिल्ली

**संसदेच्या** हिवाळी अधिवेशनात महत्वाच्या मुद्यांवर चर्चा घेण्याच्या मागणीवरून सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात गेले पाच दिवस सुरू असलेला संघर्ष अखेर आज सर्वपक्षीय बैठकीमध्ये संपुष्टात आला. देशाचे संविधान, बांगलादेशमध्ये हिंदूंवरील अत्याचार आणि उत्तर प्रदेशच्या संभल ग्ऐथे झालेला हिंसाचार या तीन महत्वाच्या मुद्यावर चर्चा घेण्याची मागणी केंद्र सरकारने मान्य केली. त्यामुळे अधिवेशनाचे कामकाज उद्यापासून सुरळीत चालू शकेल.

### हिवाळी अधिवेशनाचे कामकाज सुरळीत चालणार?

हिवाळी अधिवेशनाच्या आजच्या सलग सहाव्या दिवशी विरोधकांच्या गदारोळामुळे दोन्ही सभागृहांचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करावे लागले. त्यामुळे सूचीबद्ध असलेल्या अनेक विधेयकांवर चर्चा होऊ शकली नाही. अखेर लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी आपल्या दालनात सर्वपक्षीय बैठक बोलावली. देशाच्या संविधानावर चर्चा घेण्याची काँग्रेसची मागणी सरकारने मान्य केली. लोकसभेत १३ आणि १४ डिसेंबर रोजी तर राज्यसभेत १६ आणि १७ डिसेंबर रोजी यावर चर्चा घ्यावी असे बैठकीत सर्वानुमते ठरले.

## घाटकोपर होर्डिंग प्रकरणात भिंडेचा निर्दोष असल्याचा दावा

■ मुंबई

**घाटकोपर** येथील फलक दुर्घटनेप्रकरणी जामीन मिळाल्यानंतर इगो मीडियाचा मालक भावेश भिंडेने निर्दोष असल्याचा दावा केला आहे.

घाटकोपर फलक दुर्घटनेनंतर जनतेत निर्माण झालेला संताप कमी करण्याच्या उद्देशाने आपल्याला या प्रकरणात गोवल्याचा दावा भिंडेने केला. या प्रकरणातून दोषमुक्त करण्याच्या मागणीसाठी त्याने सत्र न्यायालयात अर्ज केला आहे. भिंडे याने याप्रकरणातील अटकेला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. अटक बेकायदा ठरवून तातडीने जामिनावर सुटका करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी केली होती. उच्च न्यायालयाने मात्र, त्याची अटक कायदेशीर ठरवून त्याची याचिका फेटाळली होती. त्यानंतर, भिंडे याने सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला होता. सत्र न्यायालयाने ऑक्टोबर महिन्यात त्याला जामीन मंजूर केला होता. भिंडे याने आता आपण निर्दोष असल्याचा दावा करून प्रकरणातून दोषमुक्त करण्याच्या मागणीसाठी सत्र न्यायालयात अर्ज केला आहे.

## जाता जाता जो बायडन यांनी आपल्या मुलाला दोषमुक्त केले



■ वॉशिंग्टन

**अमेरिकेच्या** राष्ट्राध्यक्ष पदावरुन जाता जाता जो बायडन यांनी आपले विशेष अधिकार वापरून आपला मुलगा हंटर याला त्याच्यावरील सर्व आरोपांमधून दोषमुक्त केले आहे. आपल्या मुलाला लक्ष्य केले जात असून राजकीय हेतूने त्याच्यावर गुन्हे दाखल केल्याने आपण त्याला दोषमुक्त व माफ करत असल्याचे त्यांनी या संदर्भात लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.

या पत्रात जो बायडन यांनी म्हटले आहे की, मी राष्ट्राध्यक्ष पद घेतले तेव्हा न्याय विभागाच्या निर्णयात दखल देणार नाही असे म्हटले होते. हे आश्वासन मी पाळले आहे. मात्र माझ्या असे लक्षात आले आहे की माझ्या मुलाला लक्ष्य केले जात असून त्याला चुकीच्या पद्धतीने खटल्यात अडकवले जात आहे. त्याच्यावरील आरोप हे राजकीय हेतूने प्रेरित आहेत. एक वडील म्हणून व एक राष्ट्राध्यक्ष म्हणून मी हा निर्णय का घेतला हे अमेरिकन नागरिक समजून घेतील.

जो बायडन यांचा मुलगा हंटर याच्यावर करचोरी, बेकायदा शस्त्र बाळगणे, सरकारी पैशांचा चुकीचा वापर करणे, त्याचप्रमाणे खोटी साक्ष देणे असे आरोप ठेवण्यात आले होते. पेशाने गुंतवणूक सल्लागार असलेला हंटर परदेशी कंपन्यांना सल्लागार सेवा पुरवत असतो. आपल्या मुलाला दोषमुक्त करताना राष्ट्राध्यक्षांनी पदाचा गैरवापर केल्याबद्दल टीका होत आहे.

## पुनर्विकासासाठी घरे खाली करा सफाई कामगारांना पालिकेची नोटीस

■ मुंबई

**पुनर्विकासासाठी** घरे खाली करा, अशी नोटीस बृहन्मुंबई महानगरपालिकेने विधानसभा निवडणूक संपताच सफाई कामगारांना दिली आहे. पालिकेने नोटिशीत नमूद केले की, मनपा वसाहत गौतम नगर, दादासाहेब फाळके मार्ग दादर (पू), येथील मुंबई शहर विभागातील चतुर्थ श्रेणी कामगार वसाहतींचा आश्रय योजनेच्या अंतर्गत पुनर्विकास करण्याचे नियोजित केले आहे. यानुसार या पालिका वसाहतीत वास्तव्यास असलेल्या कामगारांनी त्यांची सेवानिवासस्थाने ७ दिवसांत रिक्त करावी. त्यांना वेतनात विस्थापन भत्ता दर महिना २० हजार रुपये दिला जाणार आहे. २६ एप्रिल २०२३ च्या उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदर सूचना दिली आहे. प्रत्येक घर धारकाच्या बँक खात्यावर ७५ हजार रुपये रक्कम जमा झाली आहे. वीजबिल भरून ७ दिवसाच्या आत घर खाली करण्याच्या सूचना पालिकेने दिल्या आहेत. पुनर्विकास झाल्यावर त्याच जागी त्यांना पुन्हा आणण्यात येईल असे आश्वासन या नोटिसमध्ये दिले आहे.

# छोट्या जाहिराती
संपर्क करा ८४२२८१७४४५/८१०८११६४२३

**पाहिजेत**

लोअरपरेल रोज 500 रुपये डेलिवेजेसवर बिल्डिंगवरील टाक्यांची सफाई करण्यासाठी गरजू, मेहनती युवक पाहिजेत. वय 40 पर्यंत (प्रत्येक बुधवारी पगार, गाडी भाडे, इन्शुरन्स, युनिफॉर्म ओव्हरटाईम वेगळे) काम 9 ते 6 संपर्क : **9821819036 / 9320080200** {NC243332}

कंपनीला बँक कामासाठी फुलटाईम / पार्टटाईम मुले पाहिजेत पार्टटाईम बाईक राईडर्स पाहिजेत चांगला पगार अर्ज रेशनकार्डसहित भेटा - दुपारी ११ ते ९ स्पिडलिंक कुरीयर शॉप नं. ३ आनंद अपार्टमेंट तेलीगल्ली क्रॉस रोड अंधेरी पूर्व{NC243454}

डिलीव्हरी बॉईज पाहिजेत पगार +प्रवास खर्च कुर्ला पश्चिम संपर्क- **9326832523** {NC243473}

घरकामासाठी, बेबीकेअर (10/12 तास) पवई, परेल, माहिम, मालाडसाठी अनुभवी बायका/मुली, जवळपास राहणाऱ्या पाहिजेत. पगार (16,000 - 20,000) संपर्कः **9892575886** {NC243468}

अर्टिगा कारसाठी अनुभवी ड्रायव्हर पाहिजे वेस्टन सबबमध्ये राहणाऱ्यास प्राधान्य. **9892245393** {NC243490}

(24 तास) घरकामासाठी, बेबीकेअर, कुकींगसाठी अनुभवी ''बायका/मुली'' पाहिजेत. पगार (18,000-40,000) रंजीतसर **9321417007 / 9892575886** {NC243129}

24 तास घरकामासाठी मुले व मुली पाहिजेत. कुक, बेबी केअर, जापा मेड, नानी पगार 30, 40 हजार. मो. **9323972511** {NC243321}

पाहिजेत नॅनी, गव्हर्नेस, इंग्रजी बोलणारे, वय ३०+, पगार ४०+, संपर्कः **9323972511** {NC243496}

**पाहिजेत**

घरकामासाठी महिला मुली/मुले (भरपूर पगार) (राहण्या-खाण्याची सोय) **9820234040** (ठाणे) {NC243508}

हुशार कॉम्प्युटर ऑपरेटर/ मुली व शिपाई मुलगा पाहिजे. वाशी नवीमुंबई 9321252122 वेळ-स. ११ ते ५ {NC240090}

सिक्युरिटी - हाऊसकिपिंग कंपनीसाठी सेल्स/मार्केटिंग मॅनेजर, BDM, अकाउंट, टेलिकॉलर, ऑपरेशन्स / एरिया मॅनेजर, फिल्ड ऑफिसर, सिक्युरिटी गार्ड, सुपरवायझर हाऊसकिपिंग मुलगा/मुलगी पाहिजे. **7208004613 / 14** sales@strictfacilty services.com {NC243269}

बोरीवली (ईस्ट) गोडाऊन/ डिलीव्हरीसाठी फ्रेशर डिलीव्हरी बॉय पाहिजे. पगार 10,500/- (वय १८ ते ४०). **8655188552** {NC243474}

गोरेगाव (पूर्व) FEMALE ऑफीस असिस्टंट पाहिजेत. (TALLY ज्ञान आवश्यक). जवळपास राहणाऱ्यांना प्राधान्य. व्हॉटसअपः **8104047320** {NC243477}

₹ 200 प्रति तास घरकामे (झाडू, फरशी, भांडी, कपडे वाळत घालणे इ.) तुमच्या घराच्या जवळ रोज कामे मिळतील. फक्त महिलांसाठी. सकाळी 10:00 ते संध्याकाळी 7:00 संपर्क :- **9372496984** {NC243213}

प्रिंटिंग प्रेससाठी पंचिंग, फोल्डिंग ऑपरेटर, फिडरमन पाहिजेत संपर्क : **9820930362 / 9930589715** {NC243509}

गारमेंट फॅक्टरीसाठी ऑफीस बॉईज (peon) पाहिजेत. भेटाः ए-१०३, धनराज इंडस्ट्रियल इस्टेट, धनराज कंपाऊंड, एस जे मार्ग, सनमिल कंपाऊंडच्या पुढे, लोअर परेल (पश्चिम), मुंबई ४०००१३ {NC243515}

**पाहिजेत**

स्विमिंगपुल बनवण्यासाठी मुंबई , ठाणेयेथे अनुभवी प्लम्बर पाहिजेत पगार २०००० ते ३५००० इंटरव्यूसाठी कॉल - **9892510002** {NC243512}

महाविद्यालयीन विद्यार्थिनी पाहिजेत ''लग्न सोहळा मुंबई''चा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी. **9702527373.** {NC243492}

डोंबिवली मधील डॉट पेस्ट कंट्रोल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ह्या नामांकित कंपनी करीता अनुभवी आणि बिना अनुभवी टेक्निशियन हवे आहेत. संपर्क- **8652211111/ 7208453333** {NC243513}

प्रिंटर, फीडरमन आणि बॉयलर पाहिजे हायडलबर्ग ऑफसेटसाठी उल्हासनगर **9822340170** {NC243511}

**व्यवसायविषयक**

महिला/मुलींना महिन्याला 30000 रुपये कमवून देणारा ज्वेलरी बिजनेस **7738657263** {NC243283}

यशस्वी उद्योजक बना. दिवसा 3000/- कमवा. अनिरुद्धा दादर- **9967437950** विरार- **8652643434** {NC243407}

**गुंतवणूकविषयक**

गुंतवणुक (लघुउपयोग (गारमेंट) मध्ये गुंतवणुक करून दरमहा १ लाख नफा कमवा Offer- 3rd / 4th Dec. **9892073272** {NC243514}

**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**


# नेटवर्कसाठी डोंगर चढणारे गाव!



**राजस्थान आणि गुजरातच्या सीमेवर डुंगरपूर जिल्ह्यात असे एक गाव आहे जिथे गावकरी दर काही तासांनी जवळच्या डोंगरावर जाताना आणि परत खाली उतरताना दिसतात... या डोंगरावर सतत गावकऱ्यांची वर्दळ असते... जी व्यक्ती डोंगर चढते ती वर जाऊन परत येरझाऱ्या घालताना दिसते... तुम्ही विचार कराल नेमके या डोंगरावर असे आहे तरी काय? तर या डोंगरावर आहे मोबाइल नेटवर्क! जर तुम्ही इथल्या रस्त्याने गाडी चालवत असाल तर लोक डोंगरावर चढून नेटवर्कच्या आशेने फोन हवेत फिरवताना दिसतील. त्यांच्यापैकी ज्यांना नेटवर्क मिळाले असे भाग्यवान मग त्यांच्या फोनवर बसून गप्पा मारताना दिसतील.**



**आजच्या** जीवनशैलीत मोबाईलशिवाय प्रत्येक काम ठप्प होते. थोडा वेळ सुद्धा नेटवर्क नसेल तर आयुष्य थांबल्यासारखे होते. नोकरीच्या ठिकाणी असो, व्यवसाय असो, करमणूक असो किंवा अभ्यास असो, मोबाइल सर्वत्र आवश्यक झाला आहे. शहरांमध्ये आजकाल सगळे काम ५जी नेटवर्कवर पटापट होते परंतु राजस्थान आणि गुजरातच्या सीमेवर असलेल्या डुंगरपूर जिल्ह्यात अशी गावे आहेत, जिथे ५जी काय मोबाइलमध्ये साधे नेटवर्क देखील येत नाही. त्यामुळेच या गावकऱ्यांना फोनवर बोलायचे असल्यास गावातील डोंगरावर चढून, नेटवर्क शोधून मग फोन लावावा लागतो.

जिल्हा मुख्यालयापासून ३५ किलोमीटर अंतरावर असलेल्या डुंगरपूरच्या बलवानिया आणि चारवाडा गावात सात किलोमीटरच्या परिघात नेटवर्क नाही. रुग्णवाहिका बोलवणे असो किंवा मित्र आणि कुटुंबीयांना भेटणे असो, एक फोन लावण्यासाठी नेटवर्क मिळेल या आशेने लोक या डोंगरावर चढतात. सुमारे ५,००० लोकसंख्या असलेल्या या गावांमध्ये लोकांना नेटवर्क नसल्याने एकमेकांशी संपर्क साधता न येणे ही एकमेव समस्या नाही. इथले लोक अत्यावश्यक सरकारी योजनांपासून वंचित आहेत आणि काही वेळा नेटवर्क नसल्यामुळे रेशनपासूनही त्यांना वंचित राहावे लागत आहे.

शहरी भागात जिथे लोकांच्या घरातील ५ग्र कनेक्टिव्हिटीमुळे पाहिजे असेल त्या सगळ्या वस्तूंची दहा मिनिटांत घरपोच डिलिव्हरी होते तिथे रेशन मागवायला पण डोंगरवर चढावे लागते. रेशन डिलिव्हरीसाठी 'वन टाईम पासवर्ड (OTP)' लागतो पण या गावात नेटवर्कच नसल्याने ओटीपी येतच नाही, त्यामुळे रेशन डीलरदेखील या गावांकडे जायला टाळाटाळ करतात. रेशन डीलर सांगतात की येथे रेशन वितरीत करताना सामानासकट डोंगर चढावा लागतो. गावातील दुकानात नेटवर्क नसल्याने ओटीपी नसतो, मग गावकरी डोंगरावर चढतात, ओटीपी आल्यावर पुन्हा खाली उतरतात आणि सामान घेऊन जातात ; पण ही खूप वेळखाऊ प्रक्रिया होते. आता तर डिलिव्हरीच्या दिवशी, लोक गावातील दुकानाऐवजी डोंगरावरच रांग लावतात आणि मालगाडी थेट डोंगरावरच आणायला सांगतात.

गावकऱ्यांच्या आयुष्यात नेटवर्क नसल्याने अनेक समस्या निर्माण होतात. एखाद्याला अपघात झाला किंवा तब्येत खराब झाली तर रुग्णाला बघायचे की रुग्णवाहिका बोलवण्यासाठी या डोंगरवर २ किमी चढायचे हे आम्हाला कळत नाही. नेटवर्क नसल्यामुळे मुलांनाही शाळेची कामे करणे कठीण जाते. सरकार समाजकल्याणाच्या योजना लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि त्यांची ओळख करून देण्यासाठी शिबिरे आयोजित करते पण गावात नेटवर्कच नसल्यामुळे ते तसे करू शकत नाहीत. या योजनांचे फॉर्म वगैरे ऑनलाईन भरावे लागतात पण आमच्या घरांमध्ये नेटवर्कच नसल्याने आम्ही ऑनलाइन काम करूच शकत नाही. असे त्रस्त गावकरी सांगतात.

गावात नेटवर्क सेवा उपलब्ध करून द्यावी, या मागणीसाठी ग्रामस्थांनी अनेक वेळा निवेदने देऊन लोकप्रतिनिधींना या समस्येची जाणीव करून दिली, मात्र आजतागायत समस्या सुटलेली नाही.

## जळगाव रेल्वे स्थानकाजवळ रेल्वेच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

■ जळगाव

**नंदूरबारहून** जळगावला आलेल्या दोन तरुणांना रेल्वेने धडक दिल्याने एकाचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी झाला. ही घटना जळगाव रेल्वे स्थानकाजवळ घडली. ओम वाघेला (२३) असे मृत तरुणाचे नाव आहे. समर्थ रघुवंशी (२२) असे गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे आहे.

दोघे जण जळगावला येत असताना सुरतहून येणारी रेल्वे काही वेळ स्थानकाच्या अलीकडे थांबली होती. त्यामुळे ओम आणि समर्थ यांनी रेल्वेतून उतरून पायी चालत रेल्वे स्थानकाच्या दिशेने जात होते. त्यावेळी जळगावहून जाणाऱ्या तुलसी एक्स्प्रेसची त्यांना धडक बसली. दोन्ही मित्र रेल्वे रुळाजवळ फेकले गेले. त्यात ओमचा जागीच मृत्यू झाला तर समर्थ गंभीर जखमी झाला.

## माजी आ.राहुल जगतापांनी अजित पवारांची भेट घेतली

■ मुंबई

**शरद** पवार पक्षातून निलंबित केलेले माजी आमदार राहुल जगताप यांनी अजित पवार यांची भेट घेतली. या भेटीमुळे ते अजित पवारांच्या राष्ट्रवादीत जाणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.



राहुल जगताप यांना श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी हवी होती. पण महाविकास आघाडीच्या जागावाटपात ही जागा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला सुटली होती. या पक्षाने येथून अनुराधा नागावडे यांना संधी दिली होती. यामुळे नाराज झालेल्या जगताप यांनी बंडखोरी केली होती. यामुळे पक्षाने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली. या कारवाईमुळे नाराज झालेल्या जगताप यांनी शरद पवार गटाला सोडचिठ्ठी देण्याचे संकेत दिले आहेत. विशेष म्हणजे राहुल जगताप यांनी नुकतीच अजित पवारांची भेट घेतली होती. या भेटीमुळेही त्यांच्या पक्षांतराच्या चर्चेने जोर धरला आहे.

## आजचे राशी भविष्य

मंगळवार, दि. ३ डिसेंबर २०२४

अर्चना तारू

| | |
|---|---|
| मेष | घरात ताणतणाव राहील. अचानक एखादी व्याधी उद्‌भवण्याची शक्यता आहे. धार्मिकतेकडे कल राहील. |
| वृषभ | अनपेक्षित घटना घडतील. निरूत्साही राहाल. मनात काहीतरी भीती राहील. |
| मिथुन | स्त्रियांकडून धनलाभ. बोलण्यावर नियंत्रण ठेवणे महत्त्वाचे राहील. |
| कर्क | नोकरीव्यवसायातून अर्थलाभाचा दिवस. शत्रूंशी सामना करावा लागेल. |
| सिंह | नवीन कार्ययोजना आखताना विघ्न येऊ शकते. घरातील वातावरण आनंदी ठेवा. |
| कन्या | खाणे सांभाळा. पोटाचे विकार त्रास देतील. अध्यात्मात रस निर्माण होईल. |
| तूळ | जोडीदाराकडून धनलाभ होईल. काही ना काही सुखसोयी उपलब्ध होतील. |
| वृश्चिक | विनाकारण पैसे खर्च करू नका. दूरच्या प्रवासाचे बेत आखण्यास प्रतिकूलता राहील. |
| धनु | उत्तम पदार्थ खाण्यात रूची घ्याल. उत्तम वस्त्रे खरेदी कराल. |
| मकर | मनपसंत वस्तूंची खरेदी कराल. सणसमारंभात कलहाची शक्यता. सावध राहा. |
| कुंभ | खाण्यावर तसेच बोलण्यावर नियंत्रण ठेवा. धनप्राप्तीचे योग आहेत. |
| मीन | विपुल सौख्यलाभ. आध्यात्मिक प्रगतीच्या दिशेने वाटचाल होईल. |

## शुभ राशी दि. ०३/१२/२०२४

| | | |
|---|---|---|
| ५ | ३ | ८ |
| ५३ | ३० | ८० |
| ५८ | ३५ | ८५ |
| १६८ | १३९ | १८९ |
| २४९ | ४९० | २६० |

## निकाल — महाराष्ट्र सह्याद्री (महाराष्ट्र राज्य लॉटरी) सोडत सायं. 4:30 वाजता

• धनलक्ष्मी विकली लॉटरी •

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 49 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 02/12/2024

| | | | |
|---|---|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | SL-05 : 1361 | | |
| सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी | | | |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 2213 | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1435 | 2359 | 5090 हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा |

चौथे बक्षीस रु. 700/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1133 | 2877 | 4044 | 4694 | 5171 |
| 1135 | 2890 | 4127 | 4739 | 5357 |
| 1649 | 3003 | 4149 | 4914 | 5405 |
| 2004 | 3090 | 4249 | 4964 | 5414 |
| 2060 | 3193 | 4345 | 4987 | 5584 |
| 2276 | 3324 | 4384 | 4994 | 5755 |
| 2807 | 3357 | 4424 | 5091 | 5989 |
| 2858 | 3776 | 4471 | 5121 | 5999 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र सागरलक्ष्मी विकली लॉटरी

सोडत दर सोमवारी • तिकीट किमत रु. 50/- • सोडत क्र. 49 • सोडत दिनांक 02/12/2024

| | | |
|---|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख | SL-00 : 3066 | |
| उत्तेजनार्थ बक्षिस रु. 5000/- | पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी 3066 | वैशाली लॉटरी - बोरिवली |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 2054 | 2261 | 3427 | 3861 | 4419 | 6250 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 2177 | 2241 | 2813 | 2871 | 6507 | 6837 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1519 | 1821 | 2711 | 4699 | 5303 | 6731 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1290 | 1707 | 2167 | 4201 | 4876 | 6472 |

सहावे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी) — रु.100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1780 | 2128 | 2562 | 3018 | 3345 | 3845 | 4288 | 4726 | 5320 | 5716 | 6146 | 6566 |
| | | 1784 | 2152 | 2566 | 3023 | 3358 | 3847 | 4354 | 4732 | 5323 | 5725 | 6149 | 6570 |
| 1012 | 1291 | 1786 | 2153 | 2571 | 3030 | 3364 | 3868 | 4384 | 4740 | 5324 | 5754 | 6158 | 6593 |
| 1015 | 1299 | 1800 | 2158 | 2574 | 3033 | 3365 | 3869 | 4394 | 4744 | 5370 | 5761 | 6161 | 6616 |
| 1032 | 1301 | 1801 | 2160 | 2578 | 3034 | 3374 | 3884 | 4416 | 4747 | 5371 | 5769 | 6191 | 6617 |
| 1039 | 1311 | 1811 | 2202 | 2589 | 3054 | 3376 | 3893 | 4427 | 4758 | 5385 | 5794 | 6196 | 6627 |
| 1042 | 1315 | 1815 | 2203 | 2637 | 3079 | 3377 | 3931 | 4430 | 4776 | 5388 | 5795 | 6219 | 6635 |
| 1063 | 1320 | 1821 | 2212 | 2639 | 3087 | 3378 | 3943 | 4432 | 4813 | 5395 | 5825 | 6222 | 6648 |
| 1088 | 1366 | 1832 | 2217 | 2660 | 3112 | 3394 | 3953 | 4442 | 4822 | 5410 | 5840 | 6225 | 6649 |
| 1095 | 1374 | 1840 | 2218 | 2667 | 3116 | 3406 | 3964 | 4450 | 4861 | 5411 | 5855 | 6230 | 6651 |
| 1110 | 1382 | 1863 | 2232 | 2672 | 3147 | 3413 | 3983 | 4455 | 4870 | 5425 | 5857 | 6235 | 6653 |
| 1111 | 1422 | 1871 | 2241 | 2682 | 3166 | 3422 | 3984 | 4456 | 4894 | 5467 | 5891 | 6242 | 6686 |
| 1113 | 1436 | 1877 | 2253 | 2685 | 3167 | 3530 | 3989 | 4460 | 4929 | 5486 | 5892 | 6273 | 6690 |
| 1118 | 1451 | 1888 | 2268 | 2688 | 3183 | 3536 | 3992 | 4465 | 4940 | 5503 | 5898 | 6279 | 6694 |
| 1126 | 1514 | 1898 | 2280 | 2692 | 3199 | 3559 | 3993 | 4478 | 4943 | 5507 | 5905 | 6306 | 6697 |
| 1127 | 1537 | 1919 | 2284 | 2695 | 3228 | 3595 | 4003 | 4485 | 4945 | 5512 | 5907 | 6320 | 6700 |
| 1140 | 1558 | 1923 | 2286 | 2703 | 3231 | 3617 | 4029 | 4488 | 4962 | 5523 | 5910 | 6358 | 6706 |
| 1142 | 1560 | 1939 | 2292 | 2724 | 3232 | 3670 | 4042 | 4495 | 5024 | 5529 | 5922 | 6366 | 6769 |
| 1147 | 1598 | 1943 | 2294 | 2727 | 3239 | 3683 | 4043 | 4497 | 5048 | 5542 | 5951 | 6368 | 6782 |
| 1157 | 1599 | 1957 | 2297 | 2730 | 3251 | 3697 | 4047 | 4503 | 5052 | 5545 | 5955 | 6369 | 6867 |
| 1168 | 1607 | 1966 | 2299 | 2748 | 3259 | 3698 | 4048 | 4523 | 5053 | 5549 | 5973 | 6373 | 6869 |
| 1170 | 1608 | 1970 | 2314 | 2780 | 3260 | 3706 | 4051 | 4542 | 5055 | 5554 | 5979 | 6389 | 6876 |
| 1176 | 1631 | 1976 | 2326 | 2813 | 3269 | 3733 | 4054 | 4566 | 5058 | 5558 | 5985 | 6399 | 6888 |
| 1178 | 1640 | 1981 | 2330 | 2842 | 3301 | 3747 | 4067 | 4571 | 5065 | 5562 | 5995 | 6406 | 6889 |
| 1185 | 1648 | 1991 | 2372 | 2872 | 3302 | 3788 | 4092 | 4590 | 5105 | 5564 | 6012 | 6420 | 6897 |
| 1194 | 1661 | 1998 | 2405 | 2880 | 3303 | 3790 | 4094 | 4592 | 5106 | 5590 | 6060 | 6421 | 6912 |
| 1196 | 1680 | 2003 | 2439 | 2891 | 3310 | 3794 | 4174 | 4594 | 5119 | 5615 | 6066 | 6441 | 6918 |
| 1203 | 1703 | 2028 | 2442 | 2898 | 3314 | 3808 | 4218 | 4596 | 5151 | 5616 | 6069 | 6481 | 6919 |
| 1211 | 1710 | 2048 | 2462 | 2921 | 3315 | 3813 | 4220 | 4637 | 5153 | 5637 | 6076 | 6488 | 6928 |
| 1243 | 1712 | 2068 | 2464 | 2939 | 3317 | 3817 | 4222 | 4641 | 5173 | 5638 | 6080 | 6492 | 6934 |
| 1247 | 1715 | 2100 | 2492 | 2962 | 3318 | 3818 | 4224 | 4674 | 5194 | 5639 | 6088 | 6519 | 6956 |
| 1249 | 1717 | 2101 | 2518 | 2972 | 3331 | 3822 | 4245 | 4675 | 5198 | 5645 | 6098 | 6520 | 6963 |
| 1254 | 1735 | 2104 | 2525 | 2975 | 3332 | 3829 | 4267 | 4677 | 5199 | 5650 | 6106 | 6522 | 6966 |
| 1263 | 1747 | 2111 | 2528 | 2986 | 3333 | 3830 | 4273 | 4702 | 5213 | 5683 | 6111 | 6533 | 6967 |
| 1273 | 1753 | 2116 | 2540 | 3000 | 3336 | 3831 | 4274 | 4709 | 5235 | 5693 | 6134 | 6559 | 6977 |
| 1284 | 1761 | 2125 | 2544 | 3003 | 3337 | 3833 | 4280 | 4725 | 5275 | 5710 | 6138 | 6565 | 6997 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी भाग्यशाली विकली लॉटरी (महाराष्ट्र राज्य लॉटरी) सोडत संध्या. 5:00

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 49 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 02/12/2024

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10000/- | MG-01 : 2237 | ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे | | | |
| सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी | | | | | |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 2786 | सिराज एन्टरप्रायझेस, नागपूर | | | |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1919 श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई | 4000 लकी लॉटरी - अहमदनगर | 4789 रॉयल एजन्सी - आंकली | 5594 ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे | 7785 |

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 400/- | 1961 | 2536 | 3911 | 5439 | 6076 | 7278 | 8126 | 8598 |
| 1078 | 2001 | 2670 | 4046 | 5490 | 6274 | 7320 | 8134 | 8682 |
| 1249 | 2106 | 2856 | 4395 | 5596 | 6436 | 7410 | 8208 | 8751 |
| 1342 | 2172 | 2926 | 4484 | 5645 | 6766 | 7555 | 8317 | 8759 |
| 1359 | 2247 | 3125 | 4758 | 5651 | 6776 | 7619 | 8331 | 8858 |
| 1701 | 2462 | 3433 | 4920 | 5869 | 7013 | 7797 | 8348 | 8861 |
| 1737 | 2467 | 3583 | 5040 | 5901 | 7046 | 7878 | 8484 | 8866 |
| 1901 | 2520 | 3639 | 5076 | 6063 | 7067 | 7880 | 8489 | 8871 |
| 1910 | 2534 | 3730 | 5213 | 6069 | 7078 | 7911 | 8546 | 8975 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र गजलक्ष्मी सोम विकली लॉटरी (महाराष्ट्र राज्य लॉटरी) सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 49 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 02/12/2024

| मालिका | GL-00 | GL-01 | GL-02 | GL-03 | GL-04 |
|---|---|---|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | 6082 | 1394 | 4777 | 5816 | 3058 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 3464 | | | | | 6459 | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 2391 | | 2743 | | 3183 | | 5753 | | 9866 रॉयल एजन्सी - आंकली | |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0516 | 1225 | 3071 | 3599 | 5071 | 6121 | 7770 | 7775 | 8131 | 9811 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0317 | 0939 | 2388 | 2515 | 2934 | 5035 | 5426 | 5558 | 7307 | 8908 |

सहावे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी) — सहावे बक्षिस रु. 300/-

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0603 | 1193 | 2282 | 3318 | 4430 | 5351 | 6230 | 7240 | 8043 | 9132 |
| | 0680 | 1206 | 2286 | 3338 | 4446 | 5358 | 6250 | 7277 | 8188 | 9218 |
| 0029 | 0700 | 1213 | 2329 | 3374 | 4479 | 5366 | 6262 | 7394 | 8200 | 9287 |
| 0060 | 0703 | 1261 | 2342 | 3413 | 4508 | 5425 | 6292 | 7432 | 8218 | 9307 |
| 0083 | 0710 | 1299 | 2461 | 3501 | 4533 | 5442 | 6296 | 7451 | 8315 | 9530 |
| 0101 | 0756 | 1402 | 2492 | 3561 | 4543 | 5501 | 6310 | 7506 | 8419 | 9546 |
| 0120 | 0787 | 1438 | 2532 | 3576 | 4574 | 5533 | 6333 | 7513 | 8468 | 9598 |
| 0130 | 0837 | 1550 | 2622 | 3896 | 4582 | 5647 | 6396 | 7527 | 8487 | 9607 |
| 0234 | 0856 | 1671 | 2733 | 3911 | 4588 | 5659 | 6469 | 7577 | 8711 | 9689 |
| 0237 | 0857 | 1719 | 2777 | 3945 | 4609 | 5703 | 6516 | 7687 | 8824 | 9755 |
| 0319 | 0940 | 1804 | 2882 | 3967 | 4654 | 5926 | 6544 | 7726 | 8828 | 9796 |
| 0320 | 0980 | 1910 | 2907 | 4025 | 4697 | 5995 | 6572 | 7768 | 8853 | 9797 |
| 0341 | 0985 | 1918 | 2962 | 4134 | 4739 | 6006 | 6675 | 7785 | 8883 | 9839 |
| 0395 | 1105 | 2028 | 3035 | 4147 | 4749 | 6024 | 6688 | 7887 | 8886 | 9859 |
| 0396 | 1112 | 2079 | 3043 | 4241 | 5105 | 6048 | 6699 | 7934 | 8901 | 9867 |
| 0412 | 1113 | 2133 | 3054 | 4244 | 5170 | 6130 | 6708 | 7973 | 8955 | 9910 |
| 0474 | 1143 | 2202 | 3171 | 4298 | 5232 | 6132 | 7097 | 7975 | 8980 | 9931 |
| 0563 | 1154 | 2232 | 3209 | 4307 | 5295 | 6164 | 7192 | 8000 | 8987 | 9941 |
| 0572 | 1161 | 2247 | 3239 | 4400 | 5320 | 6214 | 7233 | 8008 | 9030 | 9943 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## अविनाश जाधवांचा ठाणे-पालघर जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा मागे

■ ठाणे

**मनसे** नेते अविनाश जाधव यांनी काल ठाणे आणि पालघर जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याकडे दिला. परंतु, राज ठाकरे यांनी तो स्वीकारला नाही. त्यानंतर अविनाश जाधव यांनी राज ठाकरेंची भेट घेतली. राज ठाकरे यांच्या आदेशानंतर अविनाश जाधव यांनी राजीनामा मागे घेतला आहे.



राज ठाकरे याच्या भेटीनंतर अविनाश जाधव म्हणाले की, राज ठाकरे यांनी आतापर्यंत जे आदेश दिले, त्याचे पालन केले आहे आणि आता आयुष्यात पुढेही सर्व आदेशाचे पालन करणार आहे. राजीनामा वगैरे असे काही नसते. काम करत राहायचे असते. यश मिळायचे असेल, तेव्हा मिळेल, असे राज ठाकरे यांनी मला सांगितले. पालघर जिल्ह्याची जबाबदारी तुझीच आहे. तूच या ठिकाणी जिल्हाध्यक्ष म्हणून काम करायचे आहे, असे आदेश राज ठाकरे यांनी दिले. राज ठाकरे यांनी दिलेल्या आदेशाचे पालन करून पुन्हा एकदा ठाणे आणि पालघर या दोन्ही जिल्ह्यांत मनसे पुन्हा एकदा वाढवण्याचे काम करणार आहे.

## फ्लेमिंगो परिसरात पर्यावरणवाद्यांचा चित्रपटांच्या ड्रोन शुटिंगला विरोध

■ नवी मुंबई

**ओटीटी** प्लॅटफॉर्मवर नुकत्याच प्रदर्शित झालेल्या सिकंदर का मुकद्दर नावाच्या चित्रपटासाठी



फ्लेमिंगो पक्ष्यांचे चित्रीकरण करण्यात आले होते. यासाठी ड्रोनचा वापर करण्यात आला होता. नवी मुंबईच्या फ्लेमिंगो परिसरातील टीएस चाणक्य येथे हे दृष्य चित्रीत करण्यात आले होते. यावर पर्यावरणवादी संघटनांनी नाराजी व्यक्त केली आहे. नॅटकनेक्ट फाऊंडेशनने याविषयी मॅंग्रोव्ह सेल आणि महाराष्ट्र मुख्य वननियंत्रक यांच्याकडे तक्रार केली आहे.

नॅटकनेक्टचे संचालक बी. एन. कुमार म्हणाले, चित्रपटात फ्लेमिंगोचे सौंदर्य दाखवण्यास आमचा काहीही आक्षेप नाही, परंतु विश्रांती घेणाऱ्या पक्ष्यांवरून उडवण्यात येणाऱ्या ड्रोनचा वापर नक्कीच आक्षेपार्ह आहे. ड्रोनच्या आवाजामुळे विश्रांती घेणाऱ्या पक्ष्यांना त्रास होतो आणि फ्लेमिंगो फ्लाइंग मशीनच्या संपर्कात आल्यास ते गंभीर जखमी होऊ शकतात. त्यात त्यांचा मृत्यूदेखील होऊ शकतो.

## प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ अवध ओझांची राजकारणात एन्ट्री! आपमध्ये प्रवेश

■ नवी दिल्ली



**प्रसिद्ध** शिक्षणतज्ज्ञ अवध ओझा यांनी आज अरविंद केजरीवाल आणि मनीष सिसोदिया यांच्या उपस्थितीत आम आदमी पार्टीमध्ये प्रवेश केला आहे. ते दिल्लीतील कोणत्याही जागेवरून निवडणूक लढण्यास इच्छुक आहेत. मूळचे उत्तर प्रदेशातील गोंडा येथील अवध ओझा हे युपीएससी शिक्षक आहेत. अवध ओझा यांच्या पक्ष प्रवेशावेळी अरविंद केजरीवाल म्हणाले की, क्षेत्रातील दिग्गज अवध ओझा आज आम आदमी पक्षाच्या कुटुंबाचा भाग बनत आहेत. आमचे प्रयत्न पुढे नेण्यासाठी आप परिवारात त्यांचे स्वागत आहे. तर अवध ओझा म्हणाले की, माझा पक्ष प्रवेशाचा मुख्य अजेंडा शिक्षणक्षेत्राचा विकास हा आहे. अरविंद केजरीवाल आणि मनीष सिसोदिया यांनी मला राजकारणात प्रवेश करण्याची आणि शिक्षण क्षेत्रात काम करण्याची संधी दिली आहे.

## पश्चिम बंगालमध्ये नवा पेच बटाटा व्यापाऱ्यांचा संपाचा इशारा

■ कोलकाता

**पश्चिम** बंगालमध्ये बटाट्याच्या दरावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने व्यापाऱ्यांना अन्य राज्यांत बटाट्याची विक्री करण्यावर निर्बंध लागू केले आहे. सरकारच्या या निर्णयाच्या विरोधात व्यापारी आक्रमक झाले असून निर्बंध न उठवल्यास बेमुदत संप करण्याचा इशारा दिला आहे. पश्चिम बंगालमध्ये सध्या किरकोळ बाजारात बटाटा ३५ ते ४० रुपये प्रतिकिलो भावाने विकला जात आहे. सरकारने बटाट्याचे भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी पुन्हा एकदा निर्बंध लागू केले आहेत. त्यानुसार राज्यातील घाऊक व्यापाऱ्यांना परराज्यात बटाट्याची विक्री करण्यास मनाई करण्यात आली आहे.

देश विदेश

## इंग्लंडला जाणारे ६० भारतीय कुवेतमध्ये १३ तास अडकले



■ कुवैत

**मुंबईहून** मँचेस्टरला जाणाऱ्या विमानाच्या इंजिनमध्ये बिघाड झाल्यामुळे ६० भारतीय प्रवाशांना तब्बल १३ तास कुवेत विमानतळावर अडकून राहावे लागले. शेवटी आज पहाटे दुसऱ्या विमानाने त्यांना मँचेस्टरला पाठवण्यात आले.

मुंबई हून मँचेस्टरला जाणाऱ्या गल्फ एअरच्या विमानाच्या इंजिनात बिघाड झाल्यामुळे ते कुवेत विमानतळावर उतरवण्यात आले. या ठिकाणी प्रवाशांना विमानतळावरच अडकून राहावे लागले. प्रवाशांना यावेळी जेवणही दिले नाही. त्यांना लाऊंजचा वापर करु दिला नाही. त्यामुळे विमानतळावर त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. काही प्रवाशांनी कुवेतमधील भारतीय दूतावासाशी संपर्क साधला.

दूतावासाने ही बाब गल्फ एअरच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर दूतावासाने आपले कर्मचारी भारतीय प्रवाशांच्या मदतीसाठी पाठवले व त्यांना लाऊंज वापरण्याची परवानगी दिली. अखेर गल्फ एअरने प्रवाशांना दुसऱ्या विमानाने मँचेस्टरकडे रवाना केले.

## ट्रम्प यांचे व्याही बनणार फ्रान्स देशाचे राजदूत

**वॉशिंग्टन** - अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचे जावई जैरेड कुशनर यांचे पिमाचा लल्र्स कुशनर फ्रान्सचे नवे राजदूत असतील. विशेष म्हणजे चार्ल्स कुशनर यांना टॅक्सचोरी प्रकरणात तुरुंगवास झालेला आहे. डोनाल्ड ट्रम्प आणि चार्ल्स कुशनर हे दोघे रिअल इस्टेटमधील बिझनेस पार्टनर होते. २००९ मध्ये ट्रम्प यांची कन्या इवांका हिचा चार्ल्स कुशनरचा पुत्र गैरेंड याच्याशी विवाह झाला. तेव्हापासून ट्रम्प आणि चार्ल्स व्याही बनले. मात्र ट्रम्प सत्तेत असताना चार्ल्स कुशनर यांना टॅक्स रिटर्न तयार करणे आणि फेडरल इलेक्शन कमिशनसमोर खोटी स्टेटमेंट दिल्याप्रकरणी न्यायालयाने शिक्षा ठोठावली होती.

## तामिळनाडूत फेंगलचा कहर भूस्खलनात ७ जण गाडले गेले

**चेन्नई- तामिळनाडूच्या** तिरुवन्नामलाई जिल्ह्यात काल रात्री उशिरा मुसळधार पाऊस आणि फेंगल चक्रिवादळामुळे भूस्खलन होऊन एक डोंगरकडा खाली कोसळला. या दुर्घटनेत मातीच्या ढिगाऱ्याखाली ७ जण गाडले गेले. यामध्ये लहान मुलांचा समावेश आहे. काल संध्याकाळी फेंगल चक्रीवादळाने तामिळनाडूला धडक दिली. चक्रिवादळामुळे झालेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. जागोजागी पडझड झाली. तिरुवन्नामलाई जिल्ह्यातील अन्नामलाईयार टेकडीचा कडा मुसळधार पावसांमुळे कोसळून टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या घरावर कोसळला . या घरात असलेले ७ जण ढिगाऱ्याखाली गाडले गेले. त्यामध्ये काही मुलांचा समावेश आहे. जिल्हा प्रशासनाने शोधकार्यासाठी राष्ट्रीय आणि राज्य आपत्कालीन व्यवस्थापनाकडे मदत मागितली.

## मध्य प्रदेशातील विद्यार्थ्यांसाठी अपार ओळखपत्राचे वितरण

■ भोपाळ

**एक** देश एक ओळखपत्र या संकल्पनेनुसार मध्य प्रदेशातील विद्यार्थ्यांना येत्या ९ व १० डिसेंबरला विशेष ओळखपत्रांचे वितरण करण्यात येणार आहे. राज्यातील सरकारी व खाजगी शाळांमधील १ लाख २३ हजार विद्यार्थ्यांना हे ओळखपत्र देण्यात येणार आहे.

या ओळखपत्रानुसार प्रत्येक विद्यार्थ्याला आधारकार्ड प्रमाणे एक १२ आकडी क्रमांक असलेले अपार कार्ड देण्यात येणार आहे. या ओळखपत्राचे विद्यार्थ्यांची संपूर्ण शैक्षणिक माहिती, शैक्षणिक प्रगती, त्यांची शैक्षणिक कारकिर्द याची माहिती मिळणार आहे. विविध संस्थांमध्येही या माहितीचे आदानप्रदान केले जाणार आहे.

पुढील शैक्षिणिक वर्षापर्यंत विद्यार्थ्यांची सर्व माहिती या कार्डामध्ये एकत्रित होईल असे शिक्षण विभागाने म्हटले आहे. या कार्डासाठी पालकांचे संमतीपत्र घ्यावे लागणार आहे.

## न्यूयॉर्कमधील पाकिस्तान्याचे हॉटेल घुसखोरांना देण्यास रामस्वामींचा विरोध

**न्यूयॉर्क** - अमेरिकेच्या न्यूयॉर्क शहरातील पाकिस्तानच्या मालकीचे रुझवेल्ट हॉटेल तीन वर्षांसाठी घुसखोरांना भाडेतत्वावर देण्याच्या न्यूयॉर्क शहर प्रशासनाच्या प्रस्तावावर सध्या मोठा वाद सुरू आहे. हे हॉटेल २०२० पासून बंद आहे. ते तीन वर्षांसाठी २२० दशलक्ष अमेरिकन डॉलरला घुसखोरी करणाऱ्यांना भाडेतत्वावर देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. या निर्णयाला नियोजित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याच रिपब्लिकन पार्टीचे नेते भारतीय वंशाचे विवेक रामस्वामी यांनी विरोध केला आहे. रामस्वामी हे राष्ट्राध्यक्षपदाच्या स्पर्धेतील एक उमेदवार होते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने आर्थिक अडचणीत असलेल्या पाकिस्तानला मदतीचे पॅकेज देऊ केले आहे.

## फुटबॉल सामन्यावेळी तुंबळ हाणामारी १०० हून अधिक चाहत्यांचा मृत्यू

■ एन जेरेकोर



**गिनी** या पश्चिम आफ्रिकन देशामध्ये फुटबॉल सामन्यादरम्यान मोठी दंगल उसळली. रेफरीच्या एका चुकीच्या निर्णयामुळे फुटबॉल चाहते आपआपसात भिडले. यात १०० हून अधिक जणांचा मृत्यू झाला आहे. गिनीतील शहर एन जेरेकोर येथे फुटबॉल सामन्यादरम्यान रविवारी ही घटना घडली.

प्रत्यक्षदर्शीनी दिलेल्या माहितीनुसार, हा सामना गिनीचे राजकीय नेते मामादी डुम्बौया यांच्या सन्मानार्थ आयोजित स्पर्धेचा भाग होता.गिनीमध्ये असे सामने सर्वसामान्य असतात. मॅच रेफरीच्या एका वादग्रस्त निर्णयानंतर चाहते संतापले आणि त्यांनी मैदानात घुसून हिंसाचार सुरू केला. अनेक जण रस्त्यावर धावले. तिकडेही धुमश्चक्री झाली. अनेक जण जखमी झाल्याचे दिसत होते. या घटनेचा सोशल मीडियावर व्हायरल या घटनेचा व्हिडीओ देखील व्हायरल होत आहे.

## मीनाताई ठाकरे फूल बाजारात मनोहर जोशी यांची जयंती उत्साहात साजरी

■ मुंबई

**आज** स्वर्गीय माँसाहेब मीनाताई ठाकरे फूल बाजारामध्ये शिवसेनेचे माजी मुख्यमंत्री तथा माजी लोकसभा अध्यक्ष डॉक्टर मनोहर जोशी यांची जयंती साजरी करण्यात आली. फूल बाजारातील गरीब कामगारांना ब्लँकेट व फळांचे वाटप करण्यात आले. मंडळाचे अध्यक्ष शिवराज मंडलिक हे दरवर्षी फुल व्यापाऱ्यांच्या हुषार पण गरीब मुलांना पंचवीस हजार रुपये मदत देतात.

माजी अध्यक्ष मनोज पुंडे यांनी मनोहर जोशी यांची आठवण म्हणून उपस्थित असलेल्या फुल व्यापाऱ्यांना व मान्यवरांना एक पेन भेट दिले. याप्रसंगी शिवसेना



पक्षाचे सचिव साईनाथ दुर्गे तसेच मुंबई महानगरपालिकेचे माजी नगरसेवक अनिल कोकीळ उपविभाग प्रमुख यशवंत विचले शाखाप्रमुख चंद्रकांत झगडे, युवा शाखाध्यक्ष तू शांत गोजारे, शाखा समन्वयक रविकांत पडायची, उपशाखाप्रमुख प्रवीण नरे, ज्येष्ठ शिवसैनिक लक्ष्मण भोसले, प्रदीप तावडे, मधुकर कचवे तसेच श्याम चित्रे, भरत कोतवाल, मंडळाच्या वतीने अध्यक्ष शिवराज मंडलिक, उपाध्यक्ष अविराज पवार, सचिव अजय कौसाले, खजिनदार मच्छिंद्र शेलार, संचालक दादाभाऊ येणारे, प्रवीण पुंडे, अजय खाडे, गणेश शेरकर, राजू पवार, चंद्रकांत फुलावळे, बापू लोळे, तुषार भोसले, रामदास भोसले, हरिदास मांजर्डेकर, राजेंद्र बोचरे तसेच कार्याध्यक्ष प्रकाश शेठ, बुचके फुलांचे व्यापारी दीपक गाढवे, सुनील डोंगरे, वीरेंद्र जाचक, लक्ष्मण कुवर, माऊली खंडागळे, देविदास पवार इतर बहुसंख्य फुलांचे व्यापारी कार्यक्रमास हजर होते.

## रत्नागिरीतील सात पुतळ्यांची रेडिओग्राफी सुरू! वाहतूक बंद

■ रत्नागिरी

**रत्नागिरी** पालिकेच्या हद्दीतील ७ पुतळ्यांच्या रेडिओग्राफीला आजपासून सुरुवात झाली असून पुढील दोन दिवस हे काम सुरू राहाणार आहे. सिंधुदुर्गमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यामुळे राज्यातील सर्वच पुतळ्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट आणि रेडिओग्राफी करण्याचे आदेश शासनाने दिले होते. त्यानुसार या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. या आधुनिक प्रक्रियेमुळे परिसरामध्ये रेडिएशन होऊ शकते. त्यामुळे पुतळ्यांच्या ठिकाणी व्यक्ती किंवा जनावर यांना इजा होण्याची संभावना जास्त असते. खबरदारी व सुरक्षिततेसाठी आज पासून ते ५ डिसेंबर पर्यंत मध्यरात्री १ ते ४ वाजेपर्यंत रस्ता आणि रहदारी बंद करण्यात येत आहेत, असे आदेश चंद्रकांत सूर्यवंशी यांनी दिले आहेत.

## खरे दादा, किंगमेकर! कोल्हापूर शहरात संजय मंडलिकांचे लागले बॅनर

■ कोल्हापूर

**कोल्हापूर** शहरात अनेक ठिकाणी माजी खासदार संजय मंडलिक यांचे




बॅनर लागले आहेत.'जिल्ह्यातील महायुतीच्या विजयाचे शिल्पकार', 'खरे दादा', 'किंगमेकर' असा मजकूर या बॅनरवर आहे. आहे. तसेच विधानसभेच्या निवडणुकीत विजयी झालेल्या जिल्ह्यातील दहाही मतदारसंघांत महायुतीच्या दहाही नवीन आमदारांचे फोटो आहेत. तसेच चंदगडचे अपक्ष आमदार शिवाजी पाटील यांचा फोटोदेखील लावण्यात आला आहे. हे बॅनर मंडलिक यांच्या कार्यकर्त्यांनी लावले असून त्यातून त्यांचे जिल्ह्यातील महत्त्व अधोरेखीत करण्यात आले आहे.

## श्रीलंकेमध्ये कांदा शुल्क कमी केल्याने नाशिकच्या कांदा उत्पादकांना दिलासा

■ नाशिक

**श्रीलंका** सरकारने कांदा शुल्क कमी केल्याने नाशिक जिल्ह्यातील कांदा उत्पादकांना दिलासा मिळणार आहे. नाशिकसह देशातील सुमारे ९ टक्के कांदा श्रीलंकामध्ये निर्यात होतो. आयात शुल्क ३० टक्क्यांवरून १० टक्के केल्याने श्रीलंकामध्ये कांदा निर्यात वाढणार आहे.

सध्या लाल कांद्याची आवक वाढली असून बांगलादेशने निर्यातीवर घेतलेला निर्णय सकारात्मक ठरताना दिसत आहे. श्रीलंकेला दररोज २५ ते ३० हजार बॅग



इतका कांदा लागतो. ही गरज आता भारत भागवणार आहे. श्रीलंकन चलनाप्रमाणे सध्या कांदा ३०० रुपये प्रति किलो विकला जात आहे. त्यामुळे भारतीय कांद्याला देखील चांगला दर मिळणार आहे.

## ताफ्यातील शिवशाहीचा प्रवास थांबण्याची शक्यता

■ मुंबई

**राज्य** परिवहन महामंडळाच्या एसटी ताफ्यातून शिवशाहीचा प्रवास आता थांबण्याची शक्यता आहे. या बसमध्ये तांत्रिक दोष असल्याचे निष्पन्न झाल्यावर परिवहन प्रशासन हा मोठा व महत्त्वाचा निर्णय घेण्याची शक्यता आहे. मात्र एसटी महामंडळाने या वृत्ताचे खंडन केले आहे. शिवशाही बस बंद करण्याचा कोणताही विचार नाही, असे एक्स पोस्टवर महामंडळाने स्पष्ट केले. शिवशाहीबद्दल वारंवार तक्रारी वाढल्याने एसटी प्रशासनाच्या वाहतूक विभागाने शिवशाहीला सेवेतून काढून टाकण्याचा प्रस्ताव दिला होता. सध्या एसटी महामंडळाच्या



ताफ्यात एकूण ७९२ शिवशाही बस आहेत. त्यापैकी ५०० बस धावत असून, उर्वरित ३९२ बस कार्यशाळेत विविध कारणांसाठी दाखल आहेत.

शिवशाही बस या वातानुकूलित बस आहेत. मात्र आता त्यांची वातानुकूलित यंत्रणा काढण्यात येणार असून शिवशाहीच्या रचनेत अंतर्गत व बाह्य बदल केले जाणार आहेत. शिवशाही बसचे लालपरी म्हणजे साध्या बसमध्ये रूपांतर होणार आहे. दरम्यान,२९ नोव्हेंबरला गोंदिया येथे शिवशाही बस अपघात झाला. यामध्ये ११ प्रवाशांचा मृत्यू झाला होता. यापूर्वीदेखील शिवशाही बसला अनेकदा अपघात झाले होते. शिवशाही बस अपघात संख्येत मागील काही दिवसात वाढ झाली आहे.

## मनसेचा ईव्हीएमविरोधात ठराव मनपा निवडणुकीचा अजेंडा मांडला



■ नाशिक

**महाराष्ट्र** नवनिर्माण सेनेचे शहर आणि जिल्हा पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीत ईव्हीएम विरोधात ठराव आणि आगामी नाशिक महानगरपालिकेच्या निवडणुकीचा अजेंडा मांडण्यात आला.

या बैठकीत संघटन वाढवावे, इच्छुक उमेदवार यांची चाचणी करणे, पदाधिकाऱ्यांना कामाची जबाबदारी देणे, शाखाध्यक्ष हे काम करणारेच नेमावे, महानगरपालिका यादींचा अभ्यास करणे, शाखाध्यक्ष व राजदूत यांना बूथवर काम करत प्रशिक्षण देणे या बाबत चर्चा झाली.

इच्छुक उमेदवारांनी आपले स्वतःचे संपर्क कार्यालय उघडावे, विभाग अध्यक्ष यांनी आपल्या विभागात येणाऱ्या सर्व पदाधिकाऱ्यांना आपल्या प्रभागात विविध सरकारी योजनांचे काम करण्याचे नियोजन द्यावे, उमेदवाराने आपल्या प्रभागावर परिपूर्ण लक्ष केंद्रित करावे, अशा सूचना बैठकीत देण्यात आल्या. तसेच जिल्हाध्यक्ष उपजिल्हाध्यक्ष तालुका अध्यक्ष व इतर पदाधिकाऱ्यांनी ग्रामीण मधले सर्व निवडणुका लढवणे जसे की, ग्रामपंचायत जिल्हा परिषद नगरपालिका नगरपंचायत यावर आपली ताकद लावून निवडणूक जिंकण्यावर भर द्यावा, अशी चर्चा पदाधिकाऱ्यांमध्ये झाली.

## अपूर्व हिरे घरवापसी करणार! अजित पवारांची भेट घेतली

■ मुंबई



**विधानसभा** निवडणुकीपूर्वी ठाकरे गटात प्रवेश केलेले माजी आमदार डॉ. अपूर्व हिरे यांनी आज सकाळी मुंबईत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. या भेटीत अपूर्व हिरे यांनी पुन्हा अजित पवार गटात प्रवेश करणार असल्याचा निर्णय घेतला होता.

ठाकरे गटात जाण्यापूर्वी अपूर्व हिरे अजित पवार गटामध्ये होते. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी ठाकरे गटात प्रवेश केला होता. मात्र, त्यांचा अजित पवार यांच्या सोबत चांगला संपर्क होता. त्यांनी आज सकाळी मुंबईत अजित पवार यांची भेट घेऊन शुभेच्छा दिल्या. लवकरच ते अजित पवार गटात घरवापसी करणार असल्याचे समजते. त्यांनी पक्षप्रवेश केल्यास सिडको सातपुर भागात अजित पवार गटाची ताकद वाढणार आहे. अपूर्व हिरे म्हणाले की, मंत्रीमंडळ शपथविधी झाल्यानंतर पुन्हा अजित पवार यांनी बैठकीसाठी निमंत्रण दिले आहे. आजच्या भेटीत आगामी पालिका व जिल्हा परिषद निवडणुकांसंदर्भात माझी आणि त्यांच्याशी चर्चा झाली.

## कुलाब्याच्या पर्यटनाला पालिकेचा अडथळा! नार्वेकरांचा आरोप




■ मुंबई

**कुलाब्यातील** प्रलंबित हॉर्सकॅरोसेल प्रकल्पाला पालिकेने जाणूनबुजून स्थगिती दिल्याचा आरोप कुलाबा विधानसभेचे आमदार राहुल नार्वेकर यांनी केला आहे. कुलाब्याचे पर्यटन ठिकाण होण्याच्या मार्गात पालिका प्रशासन अडथळा ठरत आहे अशी तक्रार करत नार्वेकर यांनी महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे पत्राद्वारे नाराजी व्यक्त केली. कॅरोसेल प्रकल्पाला पालिकेच्या मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिकल विभागाने मंजुरी दिली होती. तरीही काळा घोडा, कुलाबा कॉजवे, रिगल जंक्शन आणि गेटवे ऑफ इंडिया प्रकल्पांप्रमाणे हा प्रकल्प स्थगित केला आहे. कुपरेज मैदानावर पर्यटकांची वर्दळ पुन्हा वाढावी , मुलांचा किलबिलाट व्हावा यासाठी सर्व आवश्यक सुविधांसह कॅरोसेल ( मुलांना खेळण्यासाठी विविध प्रकार ) स्थापन करण्याचा प्रस्ताव नार्वेकर यांनी पालिकेला दिला होता.

## मोरा-भाऊचा धक्का लाँच बंद राहणार

■ उरण



**उरणची** जीवनवाहिनी बनलेली लाँच सेवा सागरी मार्गातील गाळ काढण्याच्या कामासाठी दररोज दोन ते तीन तास बंद ठेवली जाणार आहे. मोरा बंदरालगतचा गाळ काढण्याचे काम सहा दिवस होणार आहे.

उरण ते मुंबई दरम्यान सुरू असलेली लाँचसेवा ही उरणच्या रहिवाशांसाठी जीवनवाहिनी मानली जाते. परंतु, समुद्राच्या भरती-ओहोटीमुळे या मार्गावरील मोरा बंदरालगत सातत्याने गाळ जमा होतो. परिणामी लाँच वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. यामुळे, ओहोटीच्या वेळेस लाँचसेवा तीन ते चार तास बंद ठेवावी लागते. त्यामुळे २९ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर दरम्यान मोरा जेट्टीलगतचा गाळ काढण्याचे काम करणार आहेत. या दिवसांत दुपारी सुमारे दोन ते तीन तास लाँचसेवा बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती मोरा बंदर निरीक्षक नितीन कोळी यांनी दिली आहे.

## परीक्षण खात्यांतर्गत भरतीसाठी आज आंदोलन

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेच्या परीक्षण खात्यांतर्गत असलेल्या रोड, रिपेअर, ड्रेनेज, विद्युत खाते, स्ट्रॉम वॉटर ट्रेन, मालमत्ता या खात्यातील तसेच उद्यान, मलेरिया, बाजार व पाणी खाते, रुग्णालये, देवनार पशुवधगृह, उदंचन केंद्र या खात्यातील कामगारांनी आंदोलनाचा बडगा उगारला आहे.

पालिकेच्या अनेक विभागात सरळ सेवा भरती होत नसल्याने मोठ्या प्रमाणात जागा रिक्त आहेत. परिणामी सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर कामात अतिरिक्त भार पडत आहे. तरीही पालिकेकडून या रिक्त जागावर इतर कामगारांची भरती केली जात नाही. याच्याच निषेधार्थ म्युनिसिपल मजदूर संघटनेच्या वतीने उद्या सकाळी



९ ते ४ च्या दरम्यान आझाद मैदानावर हे धरणे आंदोलन पुकारले आहे. सद्यस्थितीत मुंबई महापालिकेच्या विविध पदावर भरती होत आहे. मात्र, पालिकेच्या परीक्षण खात्यांतर्गत भरतीकडे पालिका प्रशासन जाणूनबुजून कानडोळा करत असल्याचे चित्र आहे. परीक्षण खात्याच्या विविध पदावरील जागा रिक्त असल्याने अतिरिक्त कामाचा बोजा सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर पडत आहे. तसेच अनेक रिक्त जागेमुळे महापालिकेची दैनंदिन कामे खोळंबली आहे. परिणामी नागरिकांचा रोष कामगार-कर्मचारी-अभियंते यांना सहन करावा लागत आहे.

येणाऱ्या २ वर्षामध्ये वर नमूद खात्यातील अनेक कामगार सेवानिवृत्त होत आहेत. त्यामुळे महापालिकेची संपूर्ण व्यवस्थाच कोलमडून पडणार आहे. त्यामुळे भविष्यातली ही अडचण पाहता तत्काळ ही रिक्त पदे सरळसेवे अन्वये भरणे आवश्यक असल्याने म्युनिसिपल मजदूर संघटनेच्या वतीने आंदोलन करणार आहेत.

## जव्हार शहरात १५ दिवसांपासून बिबट्याचा वावर

**जव्हार** - जव्हार शहरात बिबट्याची दहशत पसरली आहे. गेल्या १५ दिवसांपासून शहरात बिबट्याचा वावर असल्याचे नागरिकांनी सांगितले. मात्र वनविभागाने अद्याप या बिबट्याला जेरबंद केलेले नाही. शनिवारी ३० नोव्हेंबरला रात्री शहरातील सोनार आळी परिसरात बोराडे यांच्या गोठ्यात बांधलेल्या एका प्राण्याला बिबट्याने ठार केले. याबाबत नागरिकांनी नगरपरिषद, तहसील व वन विभाग कार्यालयात पत्रव्यवहार केला.






संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# पर्यावरणातून मनुष्याच्या अस्तित्वालाच आव्हान

**गेल्या** अनेक वर्षांपासून शाश्वत विकास (सस्टेनेबल डेव्हलपमेंट) हा शब्द वारंवार वापरला जातो आहे. याचा अर्थ विकासाचे अनेक प्रकल्प राबवताना त्याच्या दुष्परिणामांवर नियंत्रण आणण्याचा त्यामागचा हेतू आहे. अर्थात जगभरातील अनेक देशांनी विज्ञान तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अफाट स्वरूपाचा विकास केला त्यामागच्या अर्थकारणातून संबंधित देशांच्या अर्थव्यवस्थाही मजबूत झाल्या. परंतु आता विकासाच्या या अनिर्बंध हव्यासापोटी काही मूलभूत समस्या उभ्या राहिल्या आहेत. यासंदर्भात जर आताच योग्य त्या उपाययोजना केल्या नाहीत. तर पुन्हा पुढच्या शंभर वर्षात एकूणच मानवी जीवनाच्या अस्तित्वाबाबत अनेक गंभीर प्रश्न निर्माण होतील. त्यातली सर्वात चिंताजनक बाब म्हणजे संपूर्ण जगातले तापमान सातत्याने वाढते आहे. हवामानातला हा विचित्र बदल केवळ नैसर्गिक स्वरूपाचा नाही. त्यामागे शेकडो अनैसर्गिक कारणे आहेत. नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संवर्धनाचा विचारच हद्दपार झाला. निसर्गावर मात करून विकासकामांचा वरवंटा फिरवला गेला. निसर्गाचे संवर्धन करण्याऐवजी त्याच्या शोषणावरच भर दिला गेला. आणि तो अजूनही तसाच सुरू आहे. या सगळ्या विकासकामांसाठी कोणताही मागचापुढचा विचार न करता बेसुमार जंगलतोड केली गेली. शहर आणि नगरांच्या वाढत्या लोकसंख्येला सामावून घेण्याकरीता सुपीक शेतीसुद्धा नष्ट केली गेली. तिथे उभी राहिलेली अक्राळविक्राळ सिमेंटची जंगले आता वेगवेगळ्या समस्या अक्षरशः हिंस्त्र स्वरूपातच समोर येत आहेत. प्रामुख्याने वाढत्या तापमानाचे अनेक दुष्परिणाम स्पष्ट झालेले आहेत. ज्यामध्ये नवनवीन रोगांचा प्रादुर्भाव होण्यापासून ते माणसाच्या एकूण कार्यक्षमतेवर परिणाम होण्यापर्यंत हे प्रकार पाहायला मिळत आहेत. म्हणूनच जगभरातील सगळ्या देशांना या बदलत्या हवामानाच्याविरोधात एकत्र येण्याची आवश्यकता वाटली. वाढते तापमान रोखण्यासाठी काय काय उपाययोजना करता येऊ शकतील यासंदर्भात जागतिक स्तरावरच्या हवामान परिषदांमध्ये विचारविनिमय होत असतो. तरीदेखील यामधून सुचवल्या जाणाऱ्या उपाययोजनांची योग्य पद्धतीने अंमलबजावणीच होत नाही. किंबहुना ज्या तातडीच्या उपाययोजना आहेत. त्या अंमलात आणण्याबाबत ठोस धोरणही आखले जात नाही.

## हरित घरांचे धोरण

तापमानाचे हे संकट केवळ वातावरणात उष्णता निर्माण करते आहे असे नाही तर यामधून नैसर्गिक साधनसंपत्तीचाही ऱ्हास होतो आहे. म्हणजे ज्या मनुष्याचे जनजीवन प्रामुख्याने निसर्गावर अवलंबून असते. त्या निसर्गालाच नख लावले गेल्याने त्या दुष्परिणामांची तीव्रता अधिक वाढलेली आहे. याचे अगदी साधे उदाहरण म्हणजे आतापर्यंत हवामानाचा विचार इतक्या गांभिर्याने झाला नव्हता. परंतु राहाण्यासाठी बांधली जाणारी सिमेंट कॉंक्रिटची घरं किंवा कार्यालये हीसुद्धा आता तापमानाला आमंत्रण देणारी ठरत आहेत. म्हणजेच काळाच्या गतीप्रमाणे घरांच्या मागणीची पूर्तता तर करावी लागतच असते. मात्र ही घरे पर्यावरणपूरक नसल्याने इतकी महागडी घरंसुद्धा राहाण्यासाठी योग्य ठरू शकत नाहीत. एसी, पंखे याशिवाय घरांमधून राहाणेदेखील मुश्किल झालेले आहे. या समस्येवरचा उपाय म्हणूनच हरित घरांची संकल्पना पुढे आली. जी जगभरात ग्रीन हाऊस म्हणून लोकप्रिय झाली. म्हणजेच अशा टोलेजंग इमारती बांधताना त्यात वापरली जाणारी बांधकाम सामुग्री ही पर्यावरणपूरक ठेवण्याचा प्रयत्न सुरू झाला. इमारतींच्या परिसरात अधिकाधिक निसर्गाचे जतन करण्यावर लक्ष दिले जाऊ लागले. अधिकाधिक नैसर्गिक प्रकाश येईल शिवाय सौर किंवा पवन ऊर्जसारख्या ऊर्जचा वापर करून इमारतींवर पाणी साठवण्याची व्यवस्था राहील. पावसाळ्याच्या काळातील पाण्याचा पुनर्वापर करण्याच्या व्यवस्था तिथे निर्माण केल्या जातात. ज्याला रेन हार्वेस्टिंग असेही म्हटले जाते. थोडक्यात उष्णता वाढवणाऱ्या साधनांचा किंवा सामुग्रींचा कमीत कमी वापर करून ज्या हरित घरांची निर्मिती अनेक देशांमध्ये होऊ लागली आहे. भारतात मात्र अजूनही त्याचे गांभीर्य सरकार आणि जनतेच्याही लक्षात आलेले दिसत नाही. खरे तर अशा हरित घरांच्या निर्मितीसाठी सर्वाधिक प्रोत्साहन देणारे धोरण सरकारने राबवले पाहिजे. अशा इमारती बांधण्यासाठी विकासकांना सवलती देत असतानाच अशी हरित घरे खरेदी करणाऱ्या सामान्य ग्राहकांना सरकारने वेगवेगळ्या योजनांमधून प्रोत्साहन दिले पाहिजे. आज ज्याप्रमाणे विजेवर चालणारी वाहने खरेदी करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते.

## सरकारच उदासीन

विकासाची गती कोणीही थांबवू शकणार नाही. पण त्या विकासातून ऱ्हास होणार नाही याची दक्षता निश्चितच घेता येऊ शकते. म्हणूनच त्याला शाश्वत विकास म्हटले गेले आहे. जो प्रामुख्याने मानवी जीवनाच्या सोयीसुविधांबाबत आश्वस्त करतो. पर्यावरणाचा समतोल आधीच बिघडलेला आहे. ज्यांना आपण नैसर्गिक संकटं म्हणतो त्याच्या निर्मितीला आता मानवनिर्मित अनैसर्गिक विकासही कारणीभूत ठरतो आहे. भारतासारख्या विकसनशील देशाने वेळीच जागे झाले पाहिजे. या हरित इमारतींच्या निर्मितीसाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून राबवले जाणारे उपाय हे नगण्य स्वरूपाचेच म्हणावे लागतील. म्हणजे अगदी महाराष्ट्रात सरकारतर्फेच बांधल्या जाणाऱ्या इमारती या पर्यावरणपूरक नाहीत. मुंबईत ठिकठिकाणी उभ्या राहाणाऱ्या म्हाडाच्या इमारती हरित इमारतींसारख्या नाहीत. अनेकठिकाणी बांधली जाणारी सरकारी कार्यालये हीदेखील तशाच तापमानाला पूरक ठरणाऱ्या साधनसामुग्रीतूनच बांधली जात आहेत. पर्यावरणाच्या नावाने जी धोरणं सरकार जाहीर करते परंतु त्याच्याच अंमलबजावणीबाबत सरकारकडूनच प्रचंड अनास्था दाखवली जाते. मग अगदी दिल्लीत उभे राहिलेले प्रचंड असे नवे संसद भवन हे पर्यावरणपूरक किंवा हरित इमारतींच्या अटींची पूर्तता करणारे आहे का अथवा मुंबईतही याच सेंट्रल व्हिस्टाच्या धर्तीवर नवे विधानभवन बांधले जाणार आहे. त्याची आखणी करताना पर्यावरणपूरकतेचा किती गांभिर्याने विचार होणार आहे. या गोष्टी अधिक महत्त्वाच्या ठरतात. म्हणजेच पर्यावरणाची काळजी जर सरकारी पातळीवरूनच प्रत्यक्ष कृतीतून व्यक्त झाली तर सामान्य माणसांना त्याचे अनुकरण करणे अधिक सोपे जाऊ शकते.


### सुविचार

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**जीव लावणारे शब्द आयुष्य घडवतात,**
**जिव्हारी लागणारे शब्द आयुष्य बिघडवतात.**

### पंचांग

मंगळवार, ३ डिसेंबर, २०२४
शक १९४६ क्रोधीनामसंवत्सर
मार्गशीर्ष शुक्ल द्वितीया
नक्षत्र : मूळ



-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० धनु

रवी उदय- ०६-५८
रवी अस्त- १७-५९

जमादिलाखर मासारंभ

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## कविता...

### सन्मान दिव्यांगांचा

दिव्यांगांचा सन्मान
देशाची असे शान
दिव्यांगांचा करावा
सर्वांनी सन्मान
अविभाज्य घटक
दिव्यांग समाजाचे
हात पुढे असावे
त्यांना सहकार्याचे
दिव्यांग असती
समाजाचे अंग
सहकार्याने असे
भरू जीवनात रंग
दिव्यांग ही आहे
सामान्य व्यक्ती
मनोबल वाढवून
देऊ त्यांना शक्ती
दिव्यांगांचा सन्मान
देशाचा मान
दिव्यांग शक्तीने
वाढे देशाची शान

• धोंडीरामसिंह ध राजपूत •
न्यू सन्मित्र कॉलोनी,लाडगाव रोड ,वैजापूर
जि,संभाजीनगर
मो.९४२१३१२२४४.





# बांगलादेशचा डाव १६४ धावांमध्येच गडगडला दुसऱ्या कसोटीत वेस्ट इंडीजची दमदार सुरुवात

**बांगलादेश विरुद्ध वेस्ट इंडीज यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात विंडीजच्या भेदक माऱ्यासमोर बांगला देशचा डाव पत्त्याच्या बंगल्यासारखा १६४ धावांमध्ये कोसळला त्यानंतर वेस्ट इंडीजने पहिल्या डावात १ बाद ७० अशी दमदार सुरुवात केली आहे. त्यामुळे पहिल्या कसोटी सामन्याप्रमाणेच दुसर्या कसोटी सामन्यातही बांगलादेशचा पराभव होण्याची शक्यता आहे. या मालिकेत विंडीजने १-० अशी आघाडी घेतली आहे.**



■ गुयाना

**सबीना** पार्कवर बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली. पण त्यांचा हा निर्णय फलंदाजानीच चुकीचा ठरवला. बांगलादेशचा सलामीवीर जॉयला रोचने ३ धावांवर बाद केले. पाठोपाठ त्याने मोइनुल हकचा शून्यावर त्रिफळा उडवला. १० धावात २ बळी गेल्याने बांगला देशच्या तंबूत खळबळ माजली. त्यानंतर मात्र शहादमान इस्लाम आणि शहादात होसेन यांनी ७३ धावांची भागीदारी करून बांगला देशचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. पण जोसेफने होसेनचा २२ धावांवर त्रिफळा उडवून ही जोडी फोडली. शहाद्मान इस्लामने अर्धशतक झळकावले. त्याने १३७ चेंडूत ५ चौकार आणि षटकार ठोकून ६४ धावा केल्या. मात्र त्याला जोसेफने बाद केले. त्यानंतर कर्णधार मिर्झा सोडला तर एकही फलंदाजाला खेळपट्टीवर पाय रोवून उभे राहता आले नाही. अनुभवी लिटन दासला सिल्स्ने १ धावेवर बाद केले. तर जाफर अलीला जोसेफने १ धावेवरच तंबूचा रस्ता दाखवला. मिर्झाने ३६ तर तन्जिम इस्लामने १६ धावा केल्या. मिर्झाला सिल्सने तर तंजीम इस्लामला जोसेफने बाद केले. पाठोपाठ सिल्सने तौफिकला ८ तर रानाला शून्यावर बाद झाले. अशा तऱ्हेने बांगला देशच पहिला डाव १६४ धावांवर आटोपला. सेल्स्ने अवघ्या ५ धावांमध्ये ४ बळी घेतले. तर जोसेफने ४९ धावांमध्ये ३ बळी घेतले.

दरम्यान वेस्ट इंडिजची सुरुवात फारशी चांगली झाली नाही. विंडीजचा सलामीवीर लुइसला राणाने १२ धावांवर बाद केले. त्यानंतर मात्र कर्णधार ब्रेथवेट आणि कार्टी यांनी सावधपणे फलंदाजी करून पडझड होऊ दिली नाही. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेंव्हा विंडीजच्या १ बाद ७० धावा झाल्या आहेत. ब्रेथवेट ३३ तर कार्टी १९ धावांवर नाबाद आहेत.

## विंडीजच्या जेडन सील्सचे अवघ्या ५ धावांत ४ बळी

■ जमेका

**वेस्ट** इंडिजच्या ताफ्यातील जेडन सील्स याने जमेकाच्या मैदानात सुरु असलेल्या बांगलादेश विरुद्धच्या कसोटीत जबरदस्त स्पेल टाकालाय. १५.५ षटके गोलंदाजी करताना १० निर्धाव षटकांसह ५ धावा खर्च करुन त्याने बांगलादेशच्या ४ फलंदाजांना तंबूचा रस्ता दाखवला. कसोटी क्रिकेटच्या आतापर्यंतच्या इतिहासात एका डावात सर्वात कमी इकॉनॉमी रेटसह गोलंदाजी करणारा तो सातवा गोलंदाज ठरलाय.

कसोटी सिल्स्चे क्रिकेटमध्ये मागील जवळपास ४६ वर्षांत अशी कामगिरी कुणाला जमली नव्हती. बांगलादेश विरुद्धच्या कसोटी सामन्यात सर्वात कमी इकॉनॉमी रेटसह गोलंदाजी करताना कॅरेबियन गोलंदाजानं भारताच्या उमेश यादवचा विक्रम मोडित काढला. उमेश यादवने २०१५ मध्ये आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात २१ षटकात त्याने ९ धावांत ३ बळी घेतले होते.

## पाकिस्तानचा झिम्बाब्वेवर ५७ धावांनी दणदणीत विजय

■ बुलावायो

**येथे** सुरु असलेल्या झिम्बाबे विरुद्ध पाकिस्तान याच्यातील पहिल्या टीट्वेंटी सामन्यात पाकिस्तानने झिम्बाबेवर ५७ धावांनी मात केली. बुलावायो येथे रविवारी या सामना झाला. पाकिस्तानचा तैयब ताहिर हा मॅन ऑफ द मॅच ठरला. त्याने ३९ धावांची स्फोटक खेळी केली.

फलंदाजी करताना पाकिस्तानी संघाने २० षटकात ४ गड्यांच्या मोबदल्यात १६५ धावा केल्या. यामध्ये उस्मान खान ३० चेंडूत ३९ धावा व तैयब ताहिर याच्या नाबाद ३९ धावांचा वाटा आहे. तर इरफान खान याने १५ चेंडूत २७ धावा काढल्या.प्रत्युतरादाखल खेळताना झिम्बाबेचा संघ १०८ धावांतच तंबूत परतला. त्यांच्या सलामीचा फलंदाज मरुमानी याने ३३ धावा केल्या त्याच्या खेळीत ४ चौके व १ षटकाराचा समावेश आहे. तर सिकंदर रजा याने ३९ धावा केल्या. यानंतर मात्र झिम्बाबेचे बाकी फलंदाज मात्र सपशेल अपयशी ठरले.

## बालवीर स्पोर्ट्स, शिवरदेव, संघर्ष मंडळाचे शानदार विजय

जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

■ मुंबई

**बालवीर** स्पोर्ट्स, चेंबूर, शिवरदेव मंडळ, पार्ले, संघर्ष मंडळ, गोरेगाव यांनी मुंबई उपनगर कबड्डी असो. ने आयोजित केलेल्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या पुरुष द्वितीय(ब) श्रेणी गटात पहिल्या विजयाची नोंद केली. कांदिवली, सेक्टर - २ येथील दादोजी कोंडदेव क्रीडांगणावर अँडव्हर्टायजिंग आणि मार्केटिंग प्राईव्हेट लि. यांच्या संचालिका नम्रता भोसले यांच्या सौजन्याने मुंबई उपनगर कबड्डी असो. ने या स्पर्धेचे आयोजन केले आहे.


पुरुषांच्या द्वितीय श्रेणी गटात बालवीर स्पोर्ट्सने छत्रपती मंडळाचा कडवा प्रतिकार मोडून काढला. बालवीरने पहिल्या डावात लोण देत १६-०६ अशी भक्कम आघाडी घेतली होती.

दुसऱ्या डावात छत्रपतीच्या हर्षल बावकरने तुफानी चढाया करीत ही आघाडी कमी केली. पण अन्य कोणाची साथ न लाभल्याने त्यांना पराभव पत्करावा लागला. शिवरदेव मंडळाने चुरशीच्या लढतीत सिद्धिविनायक मंडळाला ४ गुणांनी नमवले.

संघर्ष मंडळाने जतिन घोडी याच्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर पोईसर जिमखान्याचा पाडाव केला. निर्धास्त मंडळाने भांडुपच्या स्वस्तिक मंडळावर सहज विजय मिळविला.

## ऑस्ट्रेलियाचे सलामीवीर रेडपाथ यांचे निधन

■ मेलबर्न



**ऑस्ट्रेलियाचे** माजी कसोटी सलामीवीर इयान रेडपाथ यांचे वयाच्या ८३ व्या वर्षी निधन झाले. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने रविवारी याबद्दल माहिती दिली. रेडपाथ हे १९६० आणि १९७० च्या दशकात ऑस्ट्रेलियन संघाचा नियमित भाग होते. रेडपथने ६६ कसोटी सामने खेळले आणि ४३. ४५ च्या सरासरीने ४७३७ धावा केल्या, ज्यात ८ शतके आणि ३१ अर्धशतक असा समावेश आहे. त्यांची सर्वोच्च धावसंख्या १७१ होती. त्यांनी ८३ विकेट्स घेतल्या.

## सराव सामन्यात पंचाचा अजब निर्णय टीम इंडियाच्या विजयानंतरही सामना सुरु

प्राईम मिनिस्टर इलेव्हन संघावर भारताचा ६ गडी राखून विजय

■ पर्थ

**टीम** इंडियानं आपल्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यामध्ये विजयाची लय कायम ठेवली आहे. पर्थमध्ये खेळवण्यात आलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियावर दणदणीत विजय मिळवला होता. त्यानंतर सराव सामन्यात देखील भारताने ऑस्ट्रेलियाचा पराभव केला आहे. भारताने ऑस्ट्रेलियाच्या प्राईम मिनिस्टर इलेव्हन संघाचा सहा विकेटने धुव्वा उडवला. या सामन्यात पावसाने देखील हजेरी लावली होती. मात्र तरी देखील हा सामना भारतानं सहा गडी राखून आपल्या खिशात घातला. मात्र या सामन्यात अशी एक घटना घडली, ज्यामुळे कर्णधार रोहित



शर्मासह खेळाडू आणि सपोर्ट स्टाफला देखील आश्चर्याचा धक्का बसला. भारतानं हा सामना जिंकल्यानंतर देखील अंपायरनं खेळ सुरूच ठेवण्याचा निर्णय घेतला. यामुळे रोहित शर्माला देखील आपले हसू आवरता आलं नाही.

टीम इंडिया आणि ऑस्ट्रेलियाच्या प्राइम मिनिस्टर इलेव्हन संघादरम्यान एक ४६ षटकांचा सराव सामना खेळवण्यात आला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाच्या संघानं भारतासमोर निर्धारीत ४६ षटकांमध्ये २४१ धावांचे लक्ष्य ठेवले होते. भारतानं ४३ व्या षटकामध्येच सहा गड्याच्या मोबदल्यात सामना जिंकला, मात्र तरी देखील अंपायरने सामना सुरूच ठेवण्याचा निर्णय घेतला.

## २४ कोटींमध्ये घेतलेल्या व्यंकटेशला मागे टाकून दीड कोटींचा राहणे शाहरुखच्या संघाचा कर्णधार

■ कोलकाता

**क्रिकेट** हा जसा मैदानावर अनिश्चिततेचा खेळ आहे. तसाच मैदानाच्या बाहेरही क्रिकेटमध्ये काहीही होऊ शकते. भारताचा माजी कसोटी कर्णधार अजिंक्य रहाणे याच्या बाबतीत असेच झाले आहे. यंदाच्या लीलावात रहाणे अनसोल्ड रहाणार होता. मात्र शेवटच्या क्षणी त्याला शाहरुखच्या संघाने दीड कोटींना विकत घेतले. तर वेंकटेश अय्यरला २४ कोटींना विकत घेतले होते. पण आता २४ कोटींच्या खेळाडूला मागे टाकून दीड कोटीत विकत घेतलेला राहणे केकेआरचा कर्णधार होणार आहे.



अजिंक्य राहणे हा पूर्वी राजस्थान रॉयल्सचा कर्णधार होता. पण राजस्थानने त्याला रिलीज केल्यानंतर तो दिल्ली कॅपिटलमधून खेळला, त्यानंतर चेन्नई सुपर किंगने त्याला संघात घेतले आणि आता के.के.आर. ने त्याच्यावर विश्वास दाखवला आहे. रहाणेच्या नेतृत्वात भारताने अनेक सामने जिंकलेत एक अनुभवी कर्णधार म्हणून त्याच्याकडे पहिले जाते म्हणूनच शाहरुखच्या संघाने त्याला विकत घेतले.

## महाराष्ट्र जिद्दीने खेळला हाच 'सुवर्ण विजय' -संदीप तावडे

■ मुंबई

**४३व्या** कुमार-मुली (ज्युनिअर) राष्ट्रीय खो-खो अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाने आणखी एक सुवर्ण विजय मिळवला. या विजयाचे महत्त्व विशद करताना महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे शासकीय परिषद सदस्य संदीप तावडे यांनी संघाच्या जिद्दीचे आणि कौशल्याचे कौतुक केले. प्रतिकूल परिस्थितीत लढण्याचा जो आपल्या मातीचा गुण आहे, तोच आपल्याला विजयाच्या मार्गावर नेतो. अंतिम सामन्यात महाराष्ट्राच्या विजयाबद्दल खात्री होती; आम्हाला फक्त तो किती गुणांनी जिंकतो हे महत्त्वाचे वाटत होते, असे तावडे यांनी नमूद केले.

ओडीसाच्या संघाने या स्पर्धेसाठी विशेष तयारी केली होती, असेही ते म्हणाले.

# ‘पीएफ’ आता अधिक पैसे काढा

**नोकरदारांसाठी भविष्य निर्वाह निधी हा निवृत्तीनंतरचा सर्वात मोठा आर्थिक आधार मानला जातो. सेवाकाळात दरमहा वेतनातून पीएफपोटी कापले जाणारे पैसे निवृत्तींनंतर हातात येतात तेव्हा नोकरदाराला सेवेचे समाधान लाभते. मात्र यादरम्यान आर्थिक अडचण आल्यास कर्मचाऱ्याला पीएफमधील काही रक्कम नियमानुसार काढता येते. याप्रमाणे कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने सदस्यांना मोठा दिलासा दिला आहे. कर्मचारी वैद्यकीय आणीबाणीसाठी पीएफ खात्यातून एक लाखांपर्यंत आगाऊ रक्कम काढू शकणार आहेत. पूव ही मर्यादा ५० हजार रुपयांपर्यंत होती आणि या मर्यादेत दुपटीने वाढ केली. ही सुविधा फॉर्म ३१ नुसार देण्यात आली आहे आणि त्याचा उल्लेख १६ एप्रिल २०२४ च्या अधिसूचनेत करण्यात आला आहे.**

**पॅरा ६८ जे काय**

पॅरा ६८ या नियमानुसार कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या वैद्यकीय खर्चासाठी काही प्रमाणात पीएफमधून पैसे काढता येणे शक्य आहे. एक महिना किंवा त्यापेक्षा अधिक काळ रुग्णालयात भरती असणे, मोठी शस्त्रक्रिया, कर्करोग, क्षयरोग, अर्धांगवायू यासारख्या गंभीर आजारांवरील उपचारांपोटी येणाऱ्या खर्चासाठी पीएफमधून पैसे काढता येतील. कर्मचाऱ्यांच्या पीएफ खात्यात पुरेशी रक्कम असेल तर तो एक लाखांपर्यंत रक्कम काढू शकतो. खात्यात कमी पैसे असतील तर उपलब्ध रक्कमेच्या













आधारावर पैसे काढता येणे शक्य आहे.

**फॉर्म ३१ मधून पैसे काढण्याची प्रक्रिया**

‘इपीएफओ’च्या फॉर्म ३१ प्रमाणे विवाह, घराचे बांधकाम, खरेदी करणे, वैद्यकीय खर्च यासारख्या आवश्यक बाबींसाठी पीएफचा पैसा वापरता येतो. यासाठी कर्मचाऱ्याला कंपनी आणि डॉक्टरांकडून साक्षांकित प्रमाणपत्र घ्यावे लागेल आणि यात संभाव्य खर्चाचा उल्लेख असतो.

**इपीएफओची नवी ऑनलाइन सुविधा**

‘इपीएफओ’ने युनिव्हर्सल अकाउंट नंबर (यूएएन) ची सुविधा सुरू केली आहे. याप्रमाणे कर्मचारी आता थेट ऑनलाइन दावा करू शकतात. यासाठी आपल्याला युएएन नंबरला ‘आधार’ आणि बँक खात्याशी जोडणे गरजेचे आहे. सर्व प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर ऑनलाइन पैसे काढता येतात. ‘इपीएफओ’च्या पोर्टलवर लॉग इन केल्यानंतर ओटीपी व्हेरिफिकेशन होते. त्याची खातरजमा झाल्यानंतर नियमानुसार काही दिवसांत खात्यात पैसे जमा होतात.

**अन्य नियम**


वैद्यकीय खर्चाशिवाय इपीएफओच्या विविध नियमांनुसार अन्य कारणांसाठी देखील पैसे काढता येतात. उदा. पॅरा ६८ बी नुसार घर खरेदी, गृहकर्ज फेडणे यासाठी पैसे काढता येणार आहेत. पॅरा ६८ के हा पाल्यांचा विवाह, उच्च शिक्षणासाठी आहे.

‘पॅरा ६८ एन’ प्रमाणे दिव्यांग लोकांना वैद्यकीय उपकरणे खरेदी करण्यासाठी पैसे काढता येतात. निवृत्तीच्या अगोदर काही आणीबाणीच्या स्थितीत पीएफ खात्यातून पैसे काढता येणे शक्य आहे.

## रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन भारतात येण्याची शक्यता

**नवी दिल्ली** - रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतीन पुढच्या वर्षीच्या सुरुवातीला भारतात येण्याची शक्यता आहे. दोन्ही देशातील करारानुसार दरवर्षी दोन्ही देशातील नेत्यांची भेट होत असते. त्यानुसार ही भेट होण्याची शक्यता आहे. भारतातील रशियन दूतावासाने ही माहिती दिली आहे. क्रेमलिनचे प्रवक्ते यूरी उशाकोव यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले की, भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुतीन यांना पाठवलेले आमंत्रण आम्हाला मिळालेले आहे. त्यावर आम्ही गंभीरपणे विचार करत आहोत.

## पुण्यातील १८ वर्षीय बेपत्ता तरुणाचा मृतदेह रायगडमधील देवकुंड दरीत आढळला



■ पुणे

**पुण्यातील** कोथरूड भागातून बेपत्ता झालेल्या अठरा वर्षीय विराज फड या तरुणाचा मृतदेह रायगडमधील देवकुंड दरीत आढळला. ताम्हिणी घाटातील देवकुंड व्हयू पॉइंट दरीतून ३० नोव्हेंबरला हा मृतदेह बचावपथकाने बाहेर काढला.

कोथरूड येथील विराज ईश्वर फड(१८) या तरुणाची सोमवारी २५ नोव्हेंबरला बेपत्ता झाल्याची तक्रार पुणे पोलीस ठाण्यात नोंदवली होती. गुरुवारी २८ नोव्हेंबरला ताम्हिणी घाट येथील देवकुंड व्ह्यू पॉईटवर काही पर्यटकांना उंच कड्याच्या शेजारी एक बॅग आढळली. त्यामध्ये मोबाईल व कपडे होते. पोलिसांच्या मदतीने या पर्यटकांनी बॅगमधील मोबाईल सुरू केला. तो बेपत्ता विराज फडचा असल्याचे समजले. त्यानंतर या भागातील दरीमध्ये विराजचा शोध सुरू झाला. वेगवेगळी बचाव पथके, ॲडव्हेंचर टीम, वनविभाग, पोलीस यंत्रणा विराजच्या शोधासाठी कामाला लागल्या. रात्री ८ वाजताच्या सुमारास खोल दरीत बचाव पथकाला विराजचा मृतदेह आढळला. या प्रकरणाचा पुढील तपास पुणे पोलीस करत आहेत. विराज फड या तरुणाचा मृत्यू कसा झाला? त्याच्यासोबत नेमके काय घडले? तो दरीत कसा पडला? घटना घडली तेव्हा त्याच्याबरोबर कोणी होते का? आठवडाभर या ठिकाणी असलेली ही बॅग कोणालाही कशीच दिसली नाही? यासंदर्भातील गूढ कायम आहे.

## नोकरीच्या पहिल्याच दिवशी अधिकाऱ्याचा अपघातात मृत्यू

**टायर फुटल्यानंतर गाडी घराला धडकली**

■ बंगळुरू

**कर्नाटकच्या** हसन जिल्ह्यात एका आयपीएस अधिकाऱ्याचा नोकरीच्या पहिल्याच दिवशी कार अपघातात मृत्यू झाला. हर्षवर्धन असे या अधिकाऱ्याचे नाव आहे. ते २०२३च्या बॅचचे आयपीएस अधिकारी होते.

हसन जिल्ह्यातील होलेनरसीपूरमध्ये पोलीस उप अधीक्षक पदासाठी त्यांची निवड झाली होती. रविवारी त्यांना सेवेत रुजू व्हायचे होते. त्यासाठी ते सरकारी कारमधून म्हैसूरहून हसनच्या दिशेने येत होते. वाटेत किट्टाने गावाजवळ त्यांच्या गाडीचा टायर फुटला. त्यामुळे चालकाचा गाडीवरील ताबा सुटला आणि गाडी रस्त्यालगतच्या घराला धडकली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या हर्षवर्धन यांना स्थानिकांनी नजिकच्या रुग्णालयात हलवले. मात्र तिथे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या गाडीचा चालकही या अपघातात गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## खवले मांजर विकण्याचा प्रयत्न कणकवलीत ५ जणांवर गुन्हा

■ कणकवली

**कणकवली** तालुक्यातील वारगाव येथे खवले मांजराची बेकायदेशीरपणे विक्री करण्याच्या प्रयत्नात असलेल्या पाच जणांना वन विभागाच्या अधिकाऱ्यांना ताब्यात घेतले. त्यांच्यावर वन्य प्राण्याची तस्करी केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींमध्ये एका अल्पवयीन मुलाचा समावेश आहे. आरोपींकडून एक खवले मांजर आणि तस्करीसाठी वापरलेली महिंद्रा पिकअप गाडी त्याब्यात घेण्यात आली. वारगाव येथे काही जण खवले मांजराची विक्री करण्यासाठी येणार आहेत,अशी माहिती वन विभागाला मिळाली होती. त्यानुसार वनविभागाच्या पथकाने सापळा रचला.त्यावेळी विशाल खाड्ये, संदीप घाडी, गिरीधर घाडी, गुरुनाथ घाडी हे चार आरोपी आणि एक अल्पवयीन मुलगा असे पाच जण राजस्थानी ढाबा येथे आले.

## लोणावळा एसटी आगारात विद्यार्थ्यांच्या २ गटांत हाणामारी

■ पुणे


**लोणावळा** एसटी आगारात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या दोन गटांत आज दुपारी हाणामारी झाल्याने एकच गोंधळ उडाला. हे प्रकरण थेट लोणावळा पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचले. त्यानंतर याप्रकरणी लोणावळा पोलिसांनी या विद्यार्थ्यांना बोलवून समज दिली. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. आज दुपारी साडेबारा वाजता महाविद्यालयीन दोन गट आमने- सामने आले तेव्हा दोन गटांनी एकमेकांना लाथा बुक्क्यांनी बेदम मारण्यास सुरुवात केली. हाणामारी सोडवण्यासाठी आगारामधील कर्मचारी पुढे आले. त्यांनी हा वाद मिटवण्याचा प्रयत्न केला तरी देखील काही तरुण एकमेकांना मारहाण करतच होते.

## तिरुपती मंदिर परिसरात राजकीय भाषणांना बंदी

**टीटीडी देवस्थानचा निर्णय**

■ अमरावती

**आंध्रप्रदेशातील** प्रसिद्ध तिरुपती मंदिर परिसरात राजकीय द्वेषपूर्ण भाषणांवर बंदी घातली आहे. याबाबत भगवान व्यंकटेश्वर स्वामी मंदिराचे संरक्षक तिरुमला तिरुपती देवस्थानने (टीटीडी) एक्सवरून सांगितले. राजकीय नेत्यांसह काही लोकांनी दर्शनानंतर मंदिर परिसरात माध्यमासमोर राजकीय व प्रक्षोभक विधाने केली होती. त्यामुळे येथील आध्यात्मिक शांतता भंग पावली होती. मंदिराचे पावित्र्य आणि आध्यात्मिक शांततेचे रक्षण करण्यासाठी द्वेषपूर्ण भाषणांवर बंदी घालण्याचा टीटीडीने निर्णय घेतला आहे. तसेच,सर्वांना या निर्णयाचा आदर करण्याचे आवाहन केले असून,उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचा



इशारा दिला आहे.

दरम्यान, हा नियम बऱ्याच काळापासून लागू आहे. उल्लंघन करणाऱ्यांना शिक्षा झाल्याची अनेक उदाहरणे आहेत, असे आंध्र प्रदेशचे माजी मुख्य सचिव एल.व्ही. सुब्रमण्यम यांनी सांगितले.

## राज्यात पुन्हा कंत्राटी भरती सुरू! भाजपा युतीकडून स्वप्नांवर नांगर

■ मुंबई

**राज्यात** जवळपास २.५ लाख सरकारी पदे रिक्त आहेत. विविध विभागातील मागासवर्गिय पदांचा अनुशेषही भरला नाही. विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून दहा दिवस झाले तरी राज्याचे मुख्यमंत्रीपद ही रिक्त आहे. बेरोजगारांची मोठी फौज राज्यात असून लाखो तरुण मुले मुली नोकरीची अपेक्षेने वाट पहात असताना सरकारने पुन्हा एकदा कंत्राटी भरती सुरु करून सुशिक्षित तरुणांना नोकर भरतीच्या दिलेल्या आश्वासनाला हरताळ फासला आहे. काँग्रेस पक्षाचा कंत्राटी नोकर भरतीला तीव्र विरोध असून ही भरती रद्द करा अन्यथा रस्त्यावर उतरू, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे.

यासंदर्भात प्रतिक्रीया देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, कंत्राटी पद्धतीने नोकर भरती करण्यास काँग्रेस पक्षाचा तीव्र विरोध आहे. याप्रश्नी काँग्रेस पक्ष नेहमीच तरुण मुलांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिलेला आहे. यापूर्वी भाजपा युती सरकारने सुरु केलेल्या कंत्राटी पद्धतीच्या नोकर भरतीला तीव्र विरोध केला होता. मागील सरकारमधील उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कंत्राटी भरती करणार नाही असे जाहीर करून ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी कंत्राटी भरतीचा निर्णय रद्द केला होता. यानंतरही आरोग्य विभाग व एमपीएससीच्या माध्यमातून कंत्राटी पद्धतीने लिपीक व टंकलेखक भरण्यास सरकारने परवानगी दिली होती. भारतीय जनता पक्षाच्या करनी व कथनीत फरक असतो. आताही अमरावती जिल्हा सत्र न्यायालय व एस. टी. महामंडळ यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी विभागीय कार्यालयात कंत्राटी पद्धतीने नोकर भरती करण्यासाठी जाहिरात दिली आहे. भाजपा युती सरकारच्या काळात तहसीलदार व नायब तहसीलदार पदाचीही कंत्राटी भरती करण्याची जाहिरात प्रसिद्ध केली होती. विशेष म्हणजे कंत्राटी पद्धतीने नोकर भरती करण्याची कंत्राटे भाजपाच्याच बगलबच्च्यांच्या कंपनीला दिली जातात. विधानसभा निवडणुकीत भाजपा युतीने नोकर भरतीचे आश्वासनही दिले होते.

## पंजाबच्या माजी उपमुख्यमंत्र्यांना शौचालय साफ करण्याची शिक्षा

■ चंदीगड

**शीख** समुदायाचे श्रद्धास्थान असलेल्या गुरु गोविंदसिंग यांची वेशभूषा करून फिरणाऱ्या डेरा सच्चा सौदाच्या गुरुमित रामरहीम याची पाठराखण केली. त्यांच्यावरचे गुन्हे मागे घेतले . या प्रकरणी अकाल तख्ताने पंजाबचे तत्कालीन उपमुख्यमंत्री सुखबीरसिंग बादल याना दोषी ठरवले आहे. आज बादल यांनी अकाल तख्तासमोर आपली चूक कबूल केल्यानंतर त्यांना २ दिवस सुवर्णमंदिरात शौचालय साफ करण्याची तसेच १ तास भांडी घासण्याची शिक्षा ठोठावली.

पंजाबमध्ये अकाली दलाचे सरकार असताना प्रकाशसिंग बादल हे मुख्यमंत्री तर त्यांचे चिरंजीव सुखबीरसिंग बादल हे उपमुख्यमंत्री होते . याच काळात राम रहीम यांनी गुरु गोविंदसिंग यांची वेशभूषा करून सार्वजनिक कार्यक्रमात भाग घेतला होता.त्यामुळे शीख समूहात संतापाची लाट उसळली होती.राम रहीम याच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले होते. पण सुखबीरसिंग यांनी त्यांच्यावरील मागे घेतले. अकाल तख्ताच्या ५ धर्मगुरूंनी या प्रकरणी सुखबीरसिंग , आणि प्रकाशसिंग याना दोषी ठरवले होते. प्रकाशसिंग बदल यांना देण्यात आलेली फिकर ए कौम ही पदवीही मागे घेण्यात आली होती. दरम्यान सुखबीर बादल यांनी आज अकाल तख्तासमोर आपली चूक झाल्याचे मान्य केले.

**जाहिर नोटिस**

मी, मोहित विजय पाडावे सदर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे वडील कै. विजय लक्ष्मण पाडावे रा. एस. एन. डी. टी महिला विद्यापीठ हे कार्यरत/शासकीय कर्मचारी यांचे दि.१३/११/२०१५ रोजी निधन झाले. मृत्यूपश्चात त्यांना पुढे नमूद केलेप्रमाणे कायदेशीर वारस आहेत.

| अ.क्र. | नाव | वय | मृत व्यक्तिशी नाते |
|---|---|---|---|
| १) | श्रीमती वैभवी विजय पाडावे | ५४ | पत्नी |
| २) | कु. मेघना विजय पाडावे | २७ | मुलगी |
| ३) | कु. मोहित विजय पाडावे | २० | मुलगा |

उक्त नमूद वारसांना उक्त नमूद मृत व्यक्ती पश्चात त्यांच्या अनुकंपा तत्वासाठी (शासकीय कर्मचाऱ्यांचे वारस या नात्याने), वारस दाखला हवा असल्याने तसा अर्ज तहसीलदार अंधेरी यांचेकडे केला आहे. त्याअनुषंगाने कुणा व्यक्तीचे आक्षेप असल्यास त्यांनी तहसीलदार अंधेरी यांचे कार्यालय, दादाभाई नौरोजी रोड, अंधेरी (प), मुंबई ४०००५८ यांचेकडे लेखी पुराव्यासह नोटीस प्राप्त झाल्यापासून ७ दिवसात संपर्क साधावा. अन्यथा प्रकरणी आक्षेप नाही असे समजून निर्णय घेण्यात येईल.

दिनांक : २५/११/२०२४

**मोहित विजय पाडावे**

अर्जदार नाव व पत्ता- १४ सी, रूम नं ४३, श्री सिद्धिविनायक सीएचएस, सुख सागर संकुल, दुर्गा नगर, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई ४०००६०

## अकोल्यात गॅस सिलिंडर स्फोटात ५ घरे जळून खाक

**अकोला** - अकोला शहरात गॅस सिलिंडर स्फोटात ५ घरे जळून खाक झाल्याची घटना घडली. आज दुपारी शहरातील विजय नगर परिसरात हा स्फोट झाला. त्यामुळे ५ घरांना भीषण आग लागली. घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाच्या गाड्या घटनास्थळी पोहचल्या. तब्बल १ तासाच्या प्रयत्नानंतर त्यांना आग विझवण्यात यश मिळाले.

## वर्षभरात दीड लाखहून अधिक टेक कर्मचाऱ्यांनी नोकरी गमावली

■ वॉशिंग्टन

**यंदाच्या** २०२४ या वर्षात जगभरातील महत्त्वाच्या टेक म्हणजेच तंत्रज्ञान कंपन्यामधील तब्बल दीड लाखहून अधिक कर्मचाऱ्यांनी नोकरी गमावल्याचे एका अहवालातून स्पष्ट झाले आहे. नोकर कपात करणार्या कंपन्यांमध्ये आघाडीच्या टेस्ला, इंटेल, सिस्को व मायक्रोसॉफ्टसारख्या मोठ्या कंपन्यांचाही समावेश आहे. खर्चात कपात, नवी संरचना व कृत्रिम बुद्धीमत्तेच्या वापरामुळे ही नोकरकपात झाल्याचे सांगण्यात येत आहे. यावर्षी टेस्ला या कंपनीने आपल्या २० हजार कर्मचाऱ्यांना कमी केले असून इंटेलने १५ तर सिस्कोने दहा हजार कर्मचाऱ्यांची कपात केली आहे.

बाजाराचे दडपण, वाढता खर्च कमी करणे, त्याचप्रमाणे कृत्रिम बुद्धीमत्तेवर आधारित नव्या तंत्राचा वापर यामुळे या कर्मचाऱ्यांना काढून करण्यात आले आहे. कंपन्यांनी आपल्या संशोधन व विकास विभागातील कर्मचाऱ्यांची कपात करून खर्च कमी केला आहे. टेस्लाने या वर्षी अनेक वेळा कर्मचारी कपात केली. टेस्लाने आपल्या एकूण २० टक्के कर्मचाऱ्यांना कमी केले आहे. या मोठ्या कंपन्यांबरोबरच सॅपने ८०००, उबेरने साडेसहा हजार, डेल ने ६ हजार कर्मचार्यांना डच्चू दिला आहे. बेल कंपनीने तर आपल्या ५ हजार कर्मचाऱ्यांना केवळ १० मिनिटांच्या व्हिडीओ कॉलद्वारे काढून टाकले आहे. झेरॉक्सने ३ हजार व मायक्रोसॉफ्टने अडीच हजार नोकऱ्या कमी केल्या आहेत. बैजुच्या दिवाळखोरीमुळे या कंपनीतील अडीच हजार कर्मचारी बेरोजगार झाले आहेत. यामुळे आयटी कर्मचारी व तंत्रज्ञांचे मोठे नुकसान झाले आहे.

## मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्षपद पवारांकडे

■ मुंबई

**दिल्लीत** २१ ते २३ फेब्रुवारीदरम्यान होणार्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी शरद पवार यांची निवड करण्यात आली आहे. त्यांनी आयोजकांच्या विनंतीवरून स्वागताध्यक्षपद स्वीकारले आहे. ७० वर्षांनी दिल्लीत होणार्या या संमेलनाचे आयोजन सरहद संस्थेद्वारे केले जाणार आहे.

**पुणे महानगरपालिका, पुणे**

पुणे महानगरपालिका

**निविदा प्रक्रिया कक्ष पथ विभाग**

**निविदा जाहिरात - नवीन कामे**

**विक्री कालावधी दिनांक :- ०३/१२/२०२४ सकाळी ०९.०० ते १२ /१२ / २०२४ दुपारी २.३० वा. पर्यंत**

**स्विकृती दिनांक:- ०३/१२/२०२४ सकाळी ०९.०० ते १२/१२/२०२४ दुपारी २.३० वा. पर्यंत तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक: १३/१२/२०२४ रोजी दुपारी ३.०० वा.**

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रुपये | अंदाजित पुर्व गणित रक्कम रुपये | बयाना रक्कम रुपये | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/ ROAD/2024/410 | पथ | भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत गंज पेठ पोलीस चौकी ते घोरपडे पेठ पोलीस चौकी रस्ता डांबरीकरण करणे. | रु. १३५९/- | रु. ३७८७२४४/- | रु. ३७८७२/- | १२ | प्रकाशकुमार पाटील ८६६९६२८६८० |
| PMC/ ROAD/2024/411 | पथ | भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत महेश भुवन (टिंबर मार्केट) ते रामोशी गेट चौक रस्ता डांबरीकरण करणे. | रु. १३५९/- | रु. ३७८७२४४/- | रु. ३७८७२/- | १२ | प्रकाशकुमार पाटील ८६६९६२८६८० |

अ) सदर कामांबाबत निविदा अटी / शर्ती ई. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामाचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृत सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
ब) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी संच प्राप्त न झाल्यास व स्वीकृती शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.
क) ऑनलाईन निविदा प्रक्रियेबाबतची संपूर्ण माहिती टेंडर सेल विभाग, पुणे म.न.पा. येथे मिळेल.
ई) कार्यालयीन आदेश क्र.अतिमआ (वि)/३२ दि.२२/०४/२०१६ नुसार बयाना रक्कम ई. सी. एस. / आर. टी. जी. एस./एन.ई.एफ.टी. सुविधेमार्फतचा स्वीकरण्यात येणार आहे.

जाहिरात क्र. २/९९५
दिनांक : ०२/१२/२०२४

सही/-
**अधीक्षक अभियंता (पथ)**
**पुणे महानगरपालिका**

**जाहीर सूचना**

तमाम सर्वसाधारण जनतेस याद्वारे **सूचना** देण्यात येते की, माझे अशील प्लॉट क्र. ए-२, स्वामी विवेकानंद रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई ४०००५८ येथे स्थित “मेसाकॉन नेस्ट” या इमारतीमधील ७ व्या मजल्यावरील सदनिका क्र. ७०१, मोजमाप ७६९ रेरा कार्पेट क्षेत्रफळ, व त्यासह १ मेकॅनिकल स्टॅक कार पार्किंग जागा ही सदनिका (१) सौ. रमिलाबेन शाह आणि (२) सौ. नितल निशित शाह या सदनिका मालकांकडून खरेदी करण्याकरिता बोलणी करीत आहेत.

निम्न उल्लेखित सदनिकेच्या संदर्भात विक्री, देवाणघेवाण, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, ताबा, वारसा, संप्रेषण, धारणाधिकार, वहिवाट, मृत्युपत्र या मार्गे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, शीर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध असणाऱ्या, तसा दावा असणाऱ्या कोणीही/ सर्व व्यक्ती आणि/ किंवा वित्तीय संस्था यांनी त्याबाबत लेखी स्वरुपात, दाव्याच्या पृष्ठ्यर्थ सर्व नोंदणीकृत कागदपत्रांच्या नोटरीकृत सत्य प्रतींसह **वकील, श्री. दिपेश जे. सांचला यांचे कार्यालय ए-०२, तळमजला, आलोक अपार्टमेन्ट सीएचएसएल, महंत रोड विस्तारित, विलेपार्ले पूर्व, मुंबई ४०००५७** येथील कार्यालयात या सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ दिवसांच्या कालावधीमध्ये कळवावे, अन्यथा असे सर्व दावे, हक्क, शीर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध जर असल्यास, पुढील कोणत्याही सूचनेशिवाय सोडून दिले आणि/ किंवा गुंडाळून ठेवले असे समजण्यात येईल.

**मालमत्तेची अनुसूची**

प्लॉट क्र. ए-२, स्वामी विवेकानंद रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई ४०००५८ येथे स्थित “मेसाकॉन नेस्ट” या इमारतीमधील ७ व्या मजल्यावरील सदनिका क्र. ७०१, मोजमाप ७६९ रेरा कार्पेट क्षेत्रफळ, व त्यासह १ मेकॅनिकल स्टॅक कार पार्किंग जागा, आणि सदर इमारत मुंबई उपनगर जिल्ह्याच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप जिल्ह्यामधील सीटीएस क्र. ५०३/ई धारण केलेल्या गाव विलेपार्ले पश्चिम, तालुका अंधेरी येथे किंवा जवळपास स्थित असलेल्या आणि वसलेल्या जमिनीच्या प्लॉटवर बांधलेली आहे.

दिनांक: ०३.१२.२०२४

सही/-
(दिपेश जे. सांचला)
वकील

**जाहीर सूचना**

तमाम सर्वसाधारण जनतेस याद्वारे **सूचना** देण्यात येते की, माझे अशील नेहरू रोड, विलेपार्ले पूर्व, मुंबई ४०००५७ येथे स्थित असलेल्या “श्री विले पार्ले गुजराती मंडल को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.” या संस्थेमधील १ ल्या मजल्यावरील सदनिका क्र. सी-२/४०, मोजमाप ७१९ चौ.फू., कार्पेट क्षेत्रफळ अधिक अतिरिक्त ६२ चौ. फू. कार्पेट क्षेत्रफळ बाल्कनी ही सदनिका सौ. संगिता विपुल मेहता या सदनिका मालकाकडून खरेदी करण्याकरिता बोलणी करीत आहेत.

निम्न उल्लेखित सदनिकेच्या संदर्भात विक्री, देवाणघेवाण, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, ताबा, वारसा, संप्रेषण, धारणाधिकार, वहिवाट, मृत्युपत्र या मार्गे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, शीर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध असणाऱ्या, तसा दावा असणाऱ्या कोणीही/ सर्व व्यक्ती आणि/ किंवा वित्तीय संस्था यांनी त्याबाबत लेखी स्वरुपात, दाव्याच्या पृष्ठ्यर्थ सर्व नोंदणीकृत कागदपत्रांच्या नोटरीकृत सत्य प्रतींसह **वकील, श्री. दिपेश जे. सांचला यांचे कार्यालय ए-०२, तळमजला, आलोक अपार्टमेन्ट सीएचएसएल, महंत रोड विस्तारित, विलेपार्ले पूर्व, मुंबई ४०००५७** येथील कार्यालयात या सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ दिवसांच्या कालावधीमध्ये कळवावे, अन्यथा असे सर्व दावे, हक्क, शीर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध जर असल्यास, पुढील कोणत्याही सूचनेशिवाय सोडून दिले आणि/ किंवा गुंडाळून ठेवले असे समजण्यात येईल.

**मालमत्तेची अनुसूची**

नेहरू रोड, विलेपार्ले पूर्व, मुंबई ४०००५७ येथे स्थित असलेल्या “श्री विले पार्ले गुजराती मंडल को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.” या संस्थेमधील १ ल्या मजल्यावरील सदनिका क्र. सी-२/४०, मोजमाप ७१९ चौ. फू., कार्पेट क्षेत्रफळ अधिक अतिरिक्त ६२ चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ बाल्कनी आणि सदर जमिनीचा प्लॉट मुंबई उपनगर जिल्ह्याच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप जिल्ह्यामधील सुसंगत सीटीएस क्र. १२१० धारण केलेल्या गाव विलेपार्ले पूर्व, तालुका अंधेरी येथे किंवा जवळपास स्थित वसलेला आहे.

दिनांक: ०३.१२.२०२४

सही/-
(दिपेश जे. सांचला)
वकील

**जाहीर सूचना**

येथे सूचना देण्यात येत आहे की, माझे अशिल हे इमारत क्र.बी-१ च्या दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. २३, सोनल विजय प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., विजय नगर, मरोळ मरोशी रोड, मरोळ, अंधेरी (पू), मुंबई ४०० ०५९, मोजमाप क्षेत्र ४७० चौ.फूट बिल्ट अप क्षेत्र असलेले, जे जमीन सीटीएस क्र. १५७, १५८, १५९, १६०, मरोळ गाव मुंबई उपनगर जिल्ह्यातील अंधेरी तालुका **(यापुढे 'सदर फ्लॅट' म्हणून संदर्भित)** विद्यमान संयुक्त मालक सौ. रंजन देवराज करोत्रा आणि श्री. देवराज रणछोड करोत्रा यांच्याकडून खरेदी करण्याचा विचार करीत आहे.

सदर फ्लॅटच्या सध्याच्या मालकाने नोंदवल्यानुसार खालील मूळ कागदपत्रे गहाळ, हरवली आहेत आणि त्या शोधण्यायोग्य नाहीत:

१. सौ. चंद्रा पी. कौल आणि श्रीमती भागीरथी भास्करन यांच्यातील दि.१७.०६.१९८२ रोजीचा विक्रीचा मूळ करार.

२. सौ. भागीरथी भास्करन आणि सौ. कुशला जे. शेट्टी यांच्यातील दि.१४.०५.१९८६ रोजीचा विक्रीचा मूळ करार.

कोणा व्यक्तिस सदर फ्लॅट संदर्भात किंवा त्याविरुद्ध विक्री, करार, कंत्राट, विनिमय, एमओयू, भेटवस्तू, धारणाधिकार, गहाण, कर्ज, शुल्क, भाडेपट्टी, भाडेकरू, व्यवसाय, ताबा, आराम, वारसा, ट्रस्ट, खटला, राहण्याचा हक्क, देखभाल आणि पेंडन्स याद्वारे कोणताही दावा किंवा कोणतेही हितसंबंध असल्यास त्यांनी त्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत अधोस्वाक्षरी करणाऱ्यांना सहाय्यक कागदोपत्री पुराव्यांसह लेखी कळवणे आवश्यक आहे.

जर येथे आवश्यकतेनुसार कोणताही दावा प्राप्त झाला नाही किंवा केला गेला नाही, तर असे गृहित धरले जाईल की सदर फ्लॅटमधील किंवा त्यावर असा कोणताही दावा माफ केला आहे आणि/किंवा सर्व हेतू आणि उद्देशांकरिता त्याग केला आहे आणि तो माझ्या अशिलांवर बंधनकारक नसेल आणि माझे अशिल सध्याच्या मालकासह खरेदी व्यवहार पूर्ण करेल आणि अशा दाव्याचा कोणताही संदर्भ न घेता सदर व्यवहार पूर्ण केले जाईल आणि जर काही असल्यास ते माफ केले आहे असे समजले जाईल.

सही/-
**वकिल महावीर के रांभिया**
वुडलॅंड क्रेस्ट, पहिला मजला, विजय नगर समोर, पलोती चर्च जवळ मरोळ मरोशी रोड, मरोळ,
अंधेरी (पू), मुंबई ४०० ०५९

**ठिकाण:** मुंबई,
**दिनांक:** ०३.१२.२०२४

# 'पुरुष'प्रधान मानसिकतेवर भाष्य करणारे नाटक

एकेकाळी मराठी रंगभूमी गाजवणारे जयवंत दळवी यांच्या लेखणीतून साकारलेले 'पुरुष' हे नाटक चाळीस वर्षांनंतर नाट्यप्रेमींना पुन्हा एकदा अनुभवायला मिळणार आहे. स्त्री- पुरुष संबंध, सामाजिक विषमता आणि स्त्रीच्या संघर्षाची कथा यात दाखवण्यात आली होती. 'पुरुष' हे नाटक पुन्हा रंगभूमीवर आणण्याबद्दल निर्माते, अभिनेते **शरद पोंक्षे** यांनी मारलेल्या गप्पा...

**चाळीस वर्षांनी 'पुरुष' रंगभूमीवर येतेय त्याबद्दल काय सांगाल?**

आज मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. मराठी भाषा ज्या असंख्य साहित्यिकांनी समृद्ध केली. त्यातील एक अजरामर नाव म्हणजे नाटककार जयवंत दळवी. आजवर त्यांनी विविध विषयावर नाटकं, कथा कादंबऱ्या लिहिल्या. त्यापैकीच एक ऐंशीच्या दशकातील अतिशय गाजलेले नाटक 'पुरुष'. आज त्या नाटकाला ४० वर्षे उलटून गेली असून जयवंत दळवी यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने हे नाटक आम्ही पुन्हा रंगमंचावर आणत आहोत.

**हे नाटक पुन्हा रंगभूमीवर आणण्याचे खास कारण..?**

'पुरुष'मध्ये केवळ सामाजिक प्रश्न हाताळण्यात आला नसून यात त्याचे उत्तरही दडलेले आहे. हे नाटक पुन्हा एकदा रंगभूमीवर आणण्याचे आणखी एक कारण म्हणजे आजही समाजात अनेक ठिकाणी अशी परिस्थिती आहे आणि ही स्थिती मला कायमच अस्वस्थ करते. हीच विचारसरणी बदलण्यासाठी आम्ही हे नाटक घेऊन आलो आहोत.

**हे नाटक प्रेक्षकांनी का पहावे?**

स्त्री पुरुष समानता, स्त्रीची अस्मिता, समाजातील पुरुषप्रधान मानसिकतेवर टीका, सामाजिक स्थितीवर भाष्य हे विषय या कथेच्या केंद्रस्थानी असून ते प्रेक्षकांना विचार करण्यास भाग पाडणारे आहेत. राजन ताम्हाणे दिग्दर्शित, जयवंत दळवी लिखित या नाटकात माझ्यासह स्पृहा जोशी, अविनाश नारकर, अनुपमा ताकमोगे, निषाद भोईर, नेहा परांजपे हे कलाकार महत्त्वपूर्ण भूमिकेत आहेत.

**या नाटकाचे ठराविक प्रयोग होणार आहेत का?**

१४ डिसेंबर रोजी या नाटकाचा पहिला प्रयोग सादर होणार आहे. या नाटकाचे केवळ ५० प्रयोग होणार असून महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात याचे प्रयोग करण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे ही सुंदर कलाकृती आम्ही नाट्यप्रेमींसमोर घेऊन येण्यासाठी प्रचंड आतुर आहोत.




# आठवणीतल्या पहिल्या प्रेमाची गोष्ट 'इलू इलू'

पहिल्या प्रेमाच्या आठवणींचा एक हळवा कोपरा प्रत्येकजण आपल्या मनात सदैव जपत असतो. मनाच्या कोपऱ्यातील या गोड आठवणींनी मन हळवं होतं. त्या पहिल्या नजरेने, पहिल्या स्पर्शाने झालेलं 'इलू इलू' प्रत्येकाच्या आयुष्यात खूप खास असतं. प्रेमाच्या याच अलवार भावनेची हलकी झुळूक घेऊन प्रत्येकाच्या मनात दडलेल्या पहिल्या 'इलू इलू'ची आठवण ताजी करायला अजिंक्य बापू फाळके दिग्दर्शित 'इलू इलू' हा मराठी चित्रपट ३१ जानेवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येतोय. 'क्षण प्रेमाचे..गोड गुलाबी आठवणींचे'... असं म्हणत या चित्रपटाचे रोमँटिक मोशन पोस्टर प्रदर्शित झाले आहे. वीणा जामकर, आरोह वेलणकर, वनिता खरात, मीरा जगन्नाथ, निशांत भावसार, श्रीकांत यादव, कमलाकर सातपुते हे कलाकार चित्रपटात असून हॉलीवूड आणि बॉलीवूड गाजवलेला एक लक्षवेधी चेहरा या चित्रपटातून मराठी रुपेरी पडद्यावर पदार्पण करणार आहे. हा चेहरा नेमका कोणाचा? याचा उलगडा लवकरच होणार आहे.




# सुरेश वाडकरांचा शो रेडिओवर सुरू



पद्मश्री सन्मानित गायक सुरेश वाडकर आणि कुमार यांनी आजच्या धकाधकीच्या आयुष्यातून थोडा वेळ काढून आत्मशांती मिळवण्यासाठी एक खास रेडिओ शो आणला आहे. 'ऐ जिंदगी गले लगा ले' असे नाव असलेल्या या एफएम शोचे प्रसारण नुकतेच सुरू झाले. हा शो दर रविवारी रात्री ८ ते ९ वाजता माय एफएम रेडिओवर ऐकता येईल. मुंबईतील आजीवासन हॉलमध्ये एका विशेष कार्यक्रमात स्टुडिओ रिफ्युलचे कुमार यांनी या रेडिओ शोची अधिकृत घोषणा केली. यावेळी सुरेश वाडकरही उपस्थित होते. ते म्हणाले, सदमा सिनेमातल्या 'ऐ जिंदगी गले लगा ले' या गाण्यामुळे मी खूप काही शिकलो. संगीतातून जीवनाचा खरा आनंद मिळतो, हे या गाण्यातून मी शिकलो. म्हणून हा शो लोकांना नक्की आवडेल असेही वाडकर म्हणाले. सुरेश वाडकर यांचा आवाज आणि कथेच्या माध्यमातून लोकांना त्यांच्या आयुष्यात शांततेचे क्षण मिळतील, असा विश्वास या एफएम शो टीमनेही व्यक्त केला.

# लवकरच सुरू होणार काळ थांबवणारा खेळ

अनिकेत विश्वासराव, रसिका सुनील, गौतमी देशपांडे आणि प्रियदर्शन जाधव अशा एकाहून एक सुरेख अभिनेत्यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या 'दोन वाजून बावीस मिनिटांनी' या नाटकात काळाला थांबवणारा खेळ पाहायला मिळणार आहे. या नाटकाचे शुभारंभाचे प्रयोग १५, २५ आणि २८ डिसेंबरला मुंबईत रंगणार आहेत. निर्माते राजमुद्रा फिल्म्स यांनी याबाबतची माहिती इन्स्टाग्रामवर आज दिली आहे. पोस्टमधील कॅप्शनमध्ये निर्माते म्हणतात, 'लवकरच सुरू होतोय एक नवा खेळ, काळही थांबेल जेव्हा थांबेल वेळ...' या नाटकाचे दिग्दर्शन विजय केंकरे यांचे असून लेखन आणि नेपथ्य नीरज शिरवईकर यांनी केले आहे. निर्माते अजय विचारे यांच्या या नाटकाचे सूत्रधार श्रीकांत तटकरे आहेत.



# महिका शाह, शरदचा नवा व्हिडीओ दाखल




महिका शाह आणि शरद मल्होत्रा यांचा 'अधुरी दास्तान' हा नवा म्युझिक व्हिडीओ नुकताच रिलीज झाला. रिलीज होताच हा व्हिडीओ लोकप्रिय झाला आहे. या व्हिडिओद्वारे महिका शाहने आपल्या करिअरची सुरुवात केली असून पहिल्या प्रोजेक्टमध्येच ती चर्चेचा विषय ठरली आहे. मुंबईतील फिनिक्स पॅलेडियम मॉलमध्ये या गाण्याच्या प्रमोशनसाठी महिका शाह आणि अभिनेता शरद मल्होत्रा उपस्थित होते. या व्हिडीओत उत्तराखंडच्या हर्षिल व्हॅलीतील निसर्गरम्य वातावरणात या दोघांची हृदयस्पर्शी कथा दाखवली आहे. महिका शाह आणि शरद मल्होत्राची अप्रतिम केमिस्ट्री या गाण्यात उठून दिसतेय. गाण्याचे दिग्दर्शक मोहसिन खान म्हणाले, हा व्हिडीओ माझ्या हृदयाच्या खूप जवळ आहे. महिकाची उर्जा आणि शरदचा अनुभव यांनी गाण्याला वेगळ्या उंचीवर नेले आहे.



# विक्रांत मेस्सीचा बॉलीवूडला अलविदा

यशाच्या शिखरावर असताना १२ वी फेल फेम अभिनेता विक्रांत मेस्सी याने बॉलिवूडला अलविदा करण्याचा निर्णय घेतला आहे. सोशल मीडियाद्वारे त्याने ही घोषणा केली आहे. त्यात तो म्हणाला, 'नमस्कार, गेली काही वर्ष आणि त्यानंतरची काही वर्ष खूपच शानदार होती. मी तुमच्या पाठिंब्यासाठी तुम्हा सर्वांचे आभार मानतो. पण, जसजसा मी पुढे जातो, मला जाणवलंय की, आता रिकॅलिब्रेट करणं आणि घरी परत जाण्याची वेळ आली आहे. एक पती, वडील आणि एका मुलाच्या रुपात आणि अभिनेता म्हणूनही. त्यामुळे येत्या २०२५ या वर्षात आपण शेवटचे एकमेकांना भेटू, जोपर्यंत वेळ योग्य वाटत नाही... शेवटचे २ चित्रपट आणि अनेक वर्षांच्या आठवणी. पुन्हा धन्यवाद, या दरम्यानच्या सर्व गोष्टींसाठी सदैव ऋणी.' त्याच्या या निर्णयामुळे चहात्यांसह बॉलीवूडमधील मंडळी नाराज झाली आहे. विक्रांत तू घेतलेला हा निर्णय चुकीचा आहे प्लीज अभिनयाला रामराम करू नकोस, अशा कमेंट्स चाहत्यांनी पोस्टवर केल्या आहेत.



# रिंकू बनली 'जिजाई'

झी स्टुडिओज आणि कोकोनट फिल्म्स निर्मित जिजाई चित्रपटाच्या मुहूर्त सोहळ्याचा फोटो नुकताच सोशल मीडियावर पोस्ट करण्यात आला असून यात 'सैराट' फेम रिंकू राजगुरू प्रमुख भूमिकेत दिसणार आहे. तृशांत इंगळे दिग्दर्शित या चित्रपटात कपाळी चंद्रकोर लावलेली रिंकू या चित्रपटात एका वेगळ्याच अंदाजात दिसणार आहे. 'सैराट'च्या यशानंतर रिंकू राजगुरू आणि झी स्टुडिओज यांच्यात एक वेगळं नातं निर्माण झालं आहे. आता या जोडीने पुन्हा एकदा 'जिजाई'च्या माध्यमातून प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवण्याचा निर्धार केला असून हा नवीन चित्रपट लवकरच प्रकारांच्या भेटीला येणार आहे. हा चित्रपट कधी प्रदर्शित होणार, याची आता प्रेक्षक आतुरतेने वाट पाहात आहेत.

# श्रद्धा आणि वरुण पुन्हा एकत्र?

सोशल मीडियावर सध्या वरुण धवन आणि श्रद्धा कपूर यांच्या एक फोटो व्हायरल होत असून या फोटोत दिग्दर्शक डेव्हिड धवन देखील झळकत आहे. सोबत एक क्लब बोर्ड पाहायला मिळत आहे. या बोर्डवर नंबर १ असे लिहिलेले दिसत आहे. यावरून डेव्हिड धवन यांच्या सुपरहिट चित्रपटाच्या सिक्वलमध्ये वरुण आणि श्रद्धा एकत्र झळकणार का अशी चर्चा सुरू झाली आहे. ते दोघे एका जाहिरातीसाठी एकत्र आले अशी देखील चर्चा आहे. या जोडीला एकत्र पाहण्यासाठी चाहत्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. यापूर्वी ही जोडी एबीसीडी २ आणि स्ट्रीट डान्सर या चित्रपटात एकत्र झळकली होती.




# 'पुष्पा २'मध्येही श्रेयसच्या आवाजाची जादू



'पुष्पा' या चित्रपटात अभिनेता अल्लू अर्जुन याने साकारलेल्या पुष्पराज या भूमिकेला हिंदी डबसाठी अभिनेता श्रेयस तळपदे याने आवाज दिला होता. 'पुष्पा २' या चित्रपटात देखील श्रेयसच्या आवाजाची जादू पाहायला मिळणार आहे. अभिनेता श्रेयस तळपदे याने 'पुष्पा २'मधील काही सीन शेअर करत डबिंग करतानाचीही झलक शेअर केली आहे. व्हिडीओ शेअर करत त्याने लिहिले की, फ्लॉवर नहीं, फायर है में पासून नॅशनल नहीं, इंटरनॅशनल है में! आम्ही खूप पुढे आलो आहोत. 'पुष्पा २' आठवडा अधिकृतपणे सुरू झालाय आणि मी खूप उत्साहित आहे. 'पुष्पा २'साठी मला डब करण्याची पुन्हा संधी मिळाली आणि माझ्या आवाजाला तुमच्या सगळ्यांचं इतकं प्रेम मिळाले, त्यासाठी मी अत्यंत आभारी आहे.



